रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १४६ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## बीआरएसच्या कार्यालयावर हल्ला

**खम्मम :** तेलंगणातील मनुगुरु भागात काँग्रेस कार्यकर्त्यांनी बीआरएसच्या स्थानिक कार्यालयावर हल्ला केला. त्यांनी कार्यालयाची तोडफोड केली, फर्निचर जाळले आणि काँग्रेसचा झेंडा फडकावला. व्हायरल व्हिडिओमध्ये काँग्रेसचे झेंडे हातात धरून लोक बीआरएस कार्यालयात प्रवेश करत घोषणाबाजी करताना दिसत आहेत. या चकमकीदरम्यान दोन्ही बाजूंनी हाणामारी झाली आणि काही लोक जखमी झाले. काँग्रेस कार्यकर्त्यांनीही निदर्शने केली आणि आमचे कार्यालय आम्हाला परत द्या, अशी मागणी करत घोषणाबाजी केली. पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले आणि आग आटोक्यात आणली.


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ३ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹


७८ चेंडू ८७ धावा




महिला क्रिकेट विश्वचषक

# दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २९९ धावांचे आव्हान

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

महिला वनडे वर्ल्ड कप २०२५ च्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर २९८ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. शफाली वर्मा आणि दीप्ती शर्माच्या अर्धशतकांनी भारताला मजबूत स्थितीत नेले. ऋचा घोषच्या आक्रमक खेळीने भारताला ३०० धावांच्या जवळ पोहोचवले.

रविवारी (२ नोव्हेंबर) महिला वनडे वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात इतिहास रचला जाणार आहे. नवी मुंबईत भारत आणि दक्षिण आफ्रिका संघ या अंतिम सामन्यात आमने-सामने असून पहिल्या वर्ल्ड कप विजेतेपदासाठी उत्सुक आहेत. पावसामुळे दोन तास उशीराने सुरू झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर २९८ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. आता हा वर्ल्ड कप जिंकायचा असेल, तर दक्षिण आफ्रिकेला हे लक्ष्य पार करावे लागले, तर भारताला २९८ धावांच्या आत दक्षिण आफ्रिकेला रोखावे लागणार आहे. भारतासाठी शफाली वर्मा, स्मृती मानधना, दीप्ती शर्मा आणि ऋचा घोष यांनी चांगली फलंदाजी केली.

२०२५ साठी शफाली वर्मा भारतीय संघातही नव्हती, पण नशीबनं संधी दिली अन् तिने फायनलमध्ये मैदान गाजवलं; पण शतक थोडक्यात हुकलं.दक्षिण आफ्रिकेने नणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले होते. त्यामुळे प्रथम फलंदाजासाठी उतरलेल्या



■ शेफाली वर्मा, दिप्ती शर्माची अर्ध शतके

५८ चेंडू ५८ धावा

भारताकडून स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी डावाची सुरुवात केली. एका बाजूने शफाली आक्रमक खेळ करत असताना दिला स्मृतीने चांगली साथ दिली. या दोघींनी दक्षिण आफ्रिकेला सुरुवातीला यश मिळू दिले नाही. दोघींनीही शतकी भागीदारीही केली. पण अखेर १८ व्या षटकात स्मृतीला क्लो ट्रायॉनने यष्टीरक्षक सिनालो जाफ्ताच्या हातून ४५ धावांवर झेलबाद केले. त्यामुळे तिची शफालीसोबतची १०४ धावांची भागीदारी तुटली.

पण शफालीने जेमिमा रोड्रिग्सला साथीला घेतले आणि डाव पुढे नेला. शफालीने अर्धशतक करत शतकाच्या दिशेनेही वाटचाल केली होती. शफाली आणि जेमिमा यांच्यातही अर्धशतकी भागीदारी झाल्याने भारताने १५० धावांचा टप्पाही एकच विकेट गमावत सहज पूर्ण केला होता. ••पान २ वर

## वेधक

### रेवदंडा खाडीत चिखलात रुतून खलाशाचा मृत्यू

**रेवदंडा :** रेवदंडा खाडीत बेपत्ता झालेल्या एका खलाशाचा मृतदेह शनिवारी (दि. १) दुपारी आढळून आला आहे. प्रदीप कमजोरी असे मृताचे नाव आहे. मद्यधुंद अवस्थेत त्याला बोटीवर चढता न आल्याने, तो खाडीतील चिखलात रुतून बसला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. बंगालच्या उपसागरात वादळी परिस्थितीमुळे मच्छिमारी नौका किनाऱ्यावर परतल्या होत्या. काही मजूर मद्यपानासाठी बुधवारी (दि. २९) रेवदंडा जेट्टीवर उतरले. मद्यपानानंतर प्रदीप कमजोरी बोटीवर परतला नाही. खलाशांनी तत्काळ रेवदंडा पोलिसांना माहिती दिली. गेले दोन दिवस ड्रोनच्या साहाय्याने सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या पथकाने शोधमोहीम राबवली. अखेर, शनिवारी किनाऱ्यापासून साधारण दोन किलोमीटर अंतरावर चिखलात रुतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह आढळला.

# विरार-अलिबाग कॉरिडोअरला बीओटीचा आधार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका बांधा वापरा हस्तांतरित करा (बीओटी) तत्वावर राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने यासंबंधीच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. आता बीओटी तत्वानुसार हा प्रकल्प राबविण्यासाठी व्यहार्यता अभ्यासाचा प्रस्ताव एमएमआरडीसीने १५ दिवसांपूर्वी राज्य सरकारकडे सादर केला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर बहुउद्देशीय मार्गिकेतील नवघर- बलवली या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी बीओटी तत्वावर निविदा काढण्यात येणार आहेत.

एमएसआरडीसी १२६ किमी लांबीची विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका बांधणार आहे. हा प्रकल्प हाती घेऊन कित्येक वर्षे झाली तरी प्रत्यक्षात तो मार्गी लागलेला नाही. एमएसआरडीसीने या मार्गिकेतील नवघर -बलवली या पहिल्या टप्प्यासाठी निविदा प्रक्रिया राबववूत कामाला सुरुवात करण्याची तयारी सुरू केली होती. मात्र हे कामही आता लांबणीवर पडले आहे. पहिल्या टप्प्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा काही महिन्यांपूर्वी रद्द करण्यात आल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात ११ पॅकेजमध्ये मागविण्यात आलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. यासाठी ३३ निविदा सादर झाल्या होत्या. मात्र या निविदा ३६ टक्के अधिक दराने सादर झाल्या होत्या आणि त्यामुळे प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात प्रचंड वाढ झाली होती. प्रकल्पासाठी इतका निधी उपलब्ध करणे शक्य नसल्याचा मुद्दा उपस्थित करीत एमएसआरडीसीने बीओटी तत्वावर निविदा राबविण्याचा निर्णय घेतला आणि यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला. या प्रस्तावाला मान्यता देत सरकारने ऑगस्टमध्ये शासननिर्णय प्रसिद्ध केला. शासननिर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर •• पान २ वर




### ७० टक्के भूसंपादन पूर्ण करण्याचे प्रयत्न

येत्या काही महिन्यांत ७० टक्के भूसंपादन पूर्ण करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. ७० टक्के भूसंपादन पूर्ण झाले तरच कामाला सुरुवात करता येणार आहे. त्यामुळे सहा महिन्यांत ७० टक्के भूसंपादन पूर्ण करण्याचे एमएसआरडीसीचे प्रयत्न आहेत. दरम्यान, या प्रकल्पासाठी एकूण ५२ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून यापैकी अंदाजे २५ हजार कोटी रुपये बांधकामासाठी, तर उर्वरित रक्कम भूसंपादनासाठी खर्च होणार आहे.

## मनसे शहराध्यक्ष मारहाण प्रकरण
# माजी सभापतींसह सात जणांवर गुन्हा

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरातल्या मनसे शहराध्यक्ष पंकज उमासरे यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात आता मोठी कारवाई झाली आहे. महाड पंचायत समितीच्या माजी सभापती सपना मालुसरे यांच्यासह सात जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

शनिवारी पंकज फोटो स्टुडिओमध्ये झालेल्या या हल्ल्यानंतर शहरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.



हल्लेखोरांनी दुकानात घुसून उमासरे यांना बेदम मारहाण केली, तसेच दुकानातील वस्तूंची तोडफोड केली.

या प्रकरणी सपना मालुसरे, रोहन धेंडवाल, प्रशांत शेलार, धनंजय मालुसरे, ••पान २ वर

## यंदा नोव्हेंबर महिना थंडीचा नाही तर पावसाचा

**मुंबई :** नोव्हेंबर महिन्यात राज्यात किमान तापमान सरासरीच्या तुलनेत अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. परिणामी, राज्यात नोव्हेंबर महिन्यात थंडी कमी असेल. याचबरोबर देशातील अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, नोव्हेंबर महिन्यात राज्याबरोबरच संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. नोव्हेंबर महिन्यातील कमाल, किमान तापमान आणि पाऊस याचा अंदाज वर्तविण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी ••पान २ वर

# उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा निश्चित

### महापालिका ९ लाख, झेडपी ७.५० लाख तर पं.स. ५.२५ लाख

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य निवडणूक आयोगाने आगामी जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार महापालिकेच्या निवडणुकीत उमेदवारास नऊ लाखांपर्यंत खर्च करता येणार आहे. दुसरीकडे रायगड जिल्हा परिषदेसाठी उमेदवारांना प्रत्येकी साडेसात लाखांपर्यंत मर्यादा असणार आहे. पूर्वी ही मर्यादा साडेतीन लाखांचीच होती. तर पंचायत समितीच्या उमेदवारांना सव्वापाच लाखांची मर्यादा आहे.

आगामी १० ते १५ दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा पहिला टप्पा जाहीर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा आठ-नऊ वर्षांपूर्वी निश्चित झाली होती. निवडणुकीत मोठा खर्च व्हायचा, पण आयोगाची मर्यादा खूपच कमी असल्याने अनेकजण वेगवेगळ्या मार्गाने खर्च लपविण्याचा प्रयत्न करतात, अशी चर्चा नेहमीच व्हायची. त्यामुळे आता वाढलेली ••पान २ वर

## रत्नागिरीत पकडली अंबरग्रीस

**रत्नागिरी :** रत्नागिरीत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत तीन कोटी दहा लाख तीस हजार रुपये किमतीची लुप्तप्राय प्रजातीच्या माशाची अंबरग्रीस (उलटी) जप्त केली आहे. या प्रकरणी तीघांना ताब्यात घेवून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत करण्यात आलेल्या कारवाई अंबरग्रीस जप्त करुन अटक करण्यात आलेल्या तिघांवर वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रत्नागिरी एम.आय.डी.सी. परिसरातील बाफना मोटर्सच्या शेजारी काही इसम अंबरग्रीस विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची •• पान २ वर

# भातखरेदीला होणार विलंब

### पावसाच्या मुक्कामाने अडथळा; शेतीचे वेळापत्रक विस्कळीत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मेपासून सुरू झालेल्या पावसाने यंदा रायगड जिल्ह्यातील शेतीचे वेळापत्रकच विस्कळीत केले आहे. ऑक्टोबरअखेरीसही पावसाचा मुक्काम कायम राहिल्याने शेतकऱ्यांचे भातपीक काढणीला विलंब होत आहे. परिणामी भातखरेदी केंद्रे उशिरा सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यात एकूण २८ भातखरेदी केंद्रे असून, यावर्षी भाताला प्रतिक्विंटल दोन हजार ३६९ रुपयांचा दर घोषित करण्यात आला आहे. नोव्हेंबरअखेरीस ही केंद्रे सुरू होतील, अशी माहिती जिल्हा मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी के. टी. ताटे यांनी दिली.

या वर्षी पावसाने मेच्या मध्यापासूनच हजेरी लावली. जूनमध्ये अल्प विश्रांती घेतल्यानंतर जुलै महिन्यात मुसळधार पाऊस झाला. काही भागांत शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी •• पान २ वर



### जिल्ह्यात २८ भातखरेदी केंद्रे कार्यान्वित होणार

- भाताचा दर प्रतिक्विंटल २ हजार ३६९ रुपये
- ऑनलाईन नोंदणी लवकरच सुरू
- नोव्हेंबरअखेरीस खरेदी केंद्रांना प्रारंभ

# चुकीच्या ट्रीगरचा बळीराजाला फटका

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मागील वर्षीच्या आंबा हंगामातील आंबा फळपिक विमा नुकसान भरपाईची रक्कम चुकीच्या ट्रिगरमुळे शेतकऱ्यांना दिवाळी सणापूर्वी मिळत नाही. तरी सर्व ट्रिगर यांची कसोशीने अंमलबजावणी करुन पुनर्पडताळणीचे काम त्वरेने सुरु करावेत अशी आग्रही माणगी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी विनयकुमार आवटे संचालक नियोजन व प्रक्रिया कृषी आयुक्तालय पुणे यांचेकडे केली आहे. महत्वाचे म्हणजे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना विमा भरपाई सुरु देखील झाली आहे.

मात्र रायगड जिल्ह्यात नवीन समस्या उभी राहीली आहे. ती म्हणजे पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेसाठी युनिव्हर्सल सॅम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी रायगड जिल्ह्यासाठी नेमून देण्यात आलेली आहे. सन २०२४-२५ या वर्षात आंबिया बहार अंतर्गत ५२३५ शेतकऱ्यांनी एकूण ३९८१.०० हेक्टर इतक्या क्षेत्रासाठी विमा उतरवला आहे. स्वयंचलित ••पान २ वर



- शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यास विलंब
- पुनर्पडताळणीची एमएसएमजीएने केली मागणी

# अलिबाग समुद्रात दोन पर्यटक बेपत्ता

**। रायगड । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई येथून पर्यटनासाठी आलेल्या चार मित्रांपैकी दोन तरुण अलिबाग येथील समुद्रात बेपत्ता झाल्याची घटना शनिवारी (दि. १) संध्याकाळी घडली. दोन्ही तरुणांचा रात्री उशिरापर्यंत शोध घेण्यात आला, मात्र ते सापडले नाही. शशांक सिंग (उलवे) आणि पलाश पखर (सानपाडा) अशी बेपत्ता तरुणांची नावे आहेत.

चार मित्र संध्याकाळी ६:३० वाजता अलिबाग समुद्रकिनारी फेरफटका मारण्यासाठी गेले होते. त्यापैकी एक मित्र लांब खडकावर गेला असता त्याचा तोल गेला आणि तो पाण्यात पडला. मदतीसाठी त्याने मित्रांना हाक मारली. हे पाहून दुसऱ्या मित्राने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र दोघेही पाण्यात गटांगळ्या खाऊ लागले. तिसऱ्या मित्राने त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही. शेवटी त्यांनी आरडाओरड करून जवळच क्रिकेट खेळणाऱ्या मुलांना घटनेची माहिती दिली. त्या क्रिकेट खेळणाऱ्या मुलांनी बुडालेल्या मुलांना वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु लाटांच्या मंत्र्यांमध्ये बुडालेल्या दोन्ही तरुणांचा किनाऱ्यावर उभे असलेल्यांना थांगपत्ता लागला नाही. त्यांनी पोलिसांना घडलेली घटना सांगितली. घटनेची माहिती दिल्यानंतर अलिबाग पोलीस निरीक्षक किशोर साळे आणि तहसीलदार विक्रम पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने बोट, जेट-स्की आणि ड्रोनच्या सहायाने शोध मोहीम राबवली गेली. मात्र, तरुणांचा रात्री उशिरापर्यंत थांगपत्ता लागला नाही.

७ सागरी जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण होणार | ३ नोव्हेंबरपासून गणनेला सुरुवात

# मच्छिमारांची होणार जनगणना

**। रायगड । प्रतिनिधी ।**

देशातील सागरी मत्स्य व्यवसायाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून ५वी राष्ट्रीय सागरी मासेमारी गणना २०२५ हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. ही गणना ३ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर, मुंबई उपनगर या महाराष्ट्रातील ७ सागरी जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण होणार आहे.

येथे सागरी मत्स्य व्यवसायाशी संबंधित घरांची, नौकांची आणि सुविधांची तपशीलवार माहिती संकलित केली जाणार आहे. देशातील सर्व किनारपट्टी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये गणना होणार आहे. दरम्यान, यंदा मोबाइल ॲपच्या माध्यमातून जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आधुनिक पद्धतीमुळे माहिती संकलन अधिक वेगात आणि पारदर्शक होईल, असा दावा करण्यात आला आहे.

सागरी मच्छिमारांची जनगणना दर पाच वर्षांनी करण्यात येते. पारंपरिक पद्धतीने म्हणजे कागदोपत्री माहिती भरून ती कार्यालयात पाठवण्याऐवजी यंदा थेट ॲपवर माहिती संकलीत करण्यात येणार आहे. ही जणगणना ३ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत करण्यात येणार आहे. या गणनेसाठी हे ॲप विकसित करण्यात आले आहे. सेंटर मरिन फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूटने (एमएफआरआय) मोबाइल आणि •• पान २ वर



### सामाजिक बदल

अनेक तरुण मच्छिमार पारंपरिक व्यवसाय सोडून इतर व्यवसायाकडे वळले आहेत. यामुळे मासेमारी व्यवसायात कुशल मनुष्यबळाची कमतरता भासू लागली आहे. मासळी प्रक्रिया व विक्री क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत आहे.

### जनगणनेचे महत्त्व

केवळ आकडे गोळा करण्यापुरती ही जनगणना मर्यादित नाही, ती धोरण आखण्यासाठी उपयुक्त आहे. मासेमारी क्षेत्रासाठी सरकारी अनुदान, प्रशिक्षण योजना, विमा योजना आणि मत्ससंवर्धन यासाठी ही माहिती वापरली जाते. किनारी भागातील पर्यावरणीय धोके (उदा. समुद्रपातळीत वाढ, वायू प्रदूषण) ओळखण्यासाठी या माहितीचा उपयोग होतो.

# सुक्या मासळीचा हंगाम संकटात

### अवकाळी पावसामुळे वाळवणात अडचणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अवकाळी पावसाने बळीराजाबरोबर आता कोळीबांधवही संकटात सापडला आहे. वादळी वाऱ्यामुळे मच्छीमारीसाठी खोल समुद्रात जाणे धोक्याचे ठरत आहे. अशातच सुकलेल्या मासळीच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरही गदा आल्याने हंगाम वाया जाण्याची भीती आहे.

वर्षभरापासून समुद्रातून मिळणाऱ्या मासळीची आवक घटली आहे. त्यापाठोपाठ अवकाळी हजेरी लावल्याने किनारपट्टीच्या भागात सुकविण्यासाठी ठेवलेली मासळी भिजून गेली आहे. त्यामुळे सुकी मासळी विक्रीच्या हंगामातच लाखोंचे नुकसान झाले आहे.

दसऱ्यानंतर पावसाचे प्रमाण कमी झाले की दारासमोरील अंगणात शिल्लक मच्छीचे वाळवण टाकले जाते. सुकट, जवळा, बोंबील, सोडे, कोळंबी, आंबाड, वाकटी, बांगड्याचा समावेश असतो. सुक्या मच्छीला चवीमुळे मागणीही असते. दरवर्षी लाखोंची उलाढाल सुक्या मच्छीच्या विक्रीतून होत असते. यंदा पावसाने अजून काढता पाय घेतलेला नसल्याने त्याचा परिणाम सुक्या मासळीच्या हंगामावर झाला आहे.

### बदलत्या हवामानाचा परिणाम

अवकाळी पावसामुळे नवी मुंबई, उरण भागातील सुक्या मच्छीची आवक घटली आहे. हवामानातील बदलांमुळे समुद्रातील पारंपरिक मासेमारीवर मर्यादा आल्या आहेत. यामुळे सुक्या मच्छीची आवक कमी झाली आहे. समुद्रातून मिळणाऱ्या माशांची आवक घटली आहे. परिणामी, सुक्या मच्छीची आवक कमी झाली आहे. या स्थितीमुळे उत्पादनावरही त्याचा परिणाम झाला आहे.



# उरणच्या घशाला कोरड

## रानसई धरण उंची वाढविण्याचा प्रस्ताव १२ वर्षांपासून शासन दरबारी रखडलेला



। उरण । प्रतिनिधी ।

उरण परिसरात दरवर्षी समाधानकारक पाऊस पडत असला तरी पाण्याची समस्या कायम आहे. यंदाही उन्हाळ्यात उरण तालुक्यातील नागरिकांना पाण्यासाठी टंचाईच्या झळा लागण्याची शक्यता आहे. या टंचाईमागे मुख्य कारण म्हणजे एमआयडीसीच्या रानसई धरणाची मर्यादित साठवण क्षमता आणि धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव गेली १२ वर्षे प्रलंबित आहे.

उरण तालुक्यातील वाढते नागरीकरण आणि औद्योगिकीकरण लक्षात घेऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) सुमारे १९६०च्या दशकात रानसई धरण बांधले. या धरणाची मूळ साठवण क्षमता १० दशलक्ष घनमीटर (१० एमसीएम) होती. गेल्या ४५ वर्षांत धरणातील गाळ काढलेला नाही. त्यामुळे साठवण क्षमता घटून सात एमसीएमवर आली आहे. रानसई धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव हा उरणच्या पाणीपुरवठ्याचा दीर्घकालीन तोडगा ठरू शकतो. राज्याचे सध्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी यापूर्वी उरणच्या अनेक प्रश्नांवर पुढाकार घेतला आहे. त्यामुळे नागरिकांचा विश्वास आहे, की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्यापुढे हा विषय मांडल्यास उरणचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो. परंतु वनजमीन आणि पुनर्वसनाचे प्रश्न सोडवून हा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर होणे आवश्यक आहे अन्यथा उरणकरांना दरवर्षीप्रमाणेच पुन्हा पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागेल.

पुरेसा पाऊस तरीही पाणीटंचाई उरण परिसरात दरवर्षी सरासरी २,८०० मिलिमीटर पाऊस पडतो. असे असतानाही फेब्रुवारी-मार्चपासूनच पाणीटंचाई सुरू होते. पाणीपुरवठा चालू ठेवण्यासाठी हेटवणे धरणातून दररोज चार एमएलडी पाणी उसने घ्यावे लागते. परिणामी उरण तालुक्यातील २१ ग्रामपंचायती, नगरपालिका आणि औद्योगिक क्षेत्राला पुरेसे पाणी मिळत नाही. धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव पाण्याची समस्या सोडविण्यासाठी एमआयडीसीने धरणाची उंची वाढविण्याचा तांत्रिक प्रस्ताव तयार केला.

हा प्रस्ताव मंजूर झाल्यास दरवर्षी ३० दशलक्ष घनमीटर पाणी वाया जाण्यापासून वाचेल. त्यामुळे उरण तालुक्यातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटू शकतो. धरणाची उंची वाढविताना ९५ हेक्टर वनजमीन ओलिताखाली येणार आहे. तसेच रानसई ग्रामपंचायत हद्दीतील तीन आदिवासी वाड्यांचे पुनर्वसन करावे लागेल. या दोन कारणांमुळे २०१६ पासून प्रस्ताव वन विभागाच्या कार्यालयात प्रलंबित आहे. तालुक्याचा पाणीप्रश्न मिटेल रानसई धरणात गाळाची समस्या नाही. रानसई धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव २०१६मध्ये तयार झाला आहे. वन विभागाची जागा ओलिताखाली येत असल्याने वन विभागाकडे प्रलंबित आहे. उरणच्या रानसई धरणाचा हा प्रस्ताव वन विभागाकडून मंजूर झाल्यास संपूर्ण उरण तालुक्याचा पाणीप्रश्न मिटेल, असे एमआयडीसीचे अभियंता युवराज कोल्हे यांनी म्हटले आहे.

## प्रशांत गोपाळे यांना पुरस्कार प्रदान

**खोपोली** : खालापुर तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार तथा रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांना नुकताच महाराष्ट्र जर्नालिस्ट फाउंडेशन यांच्या वतीने आदर्श पत्रकार भूषण सन्मान पुरस्काराने पनवेल येथे सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केल्याने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. खालापुर तालुक्यातील ग्रामीण सावरोली गावातून प्रशांत गोपाळे यांनी नोकरी सांभाळत पत्रकारतेला सुरुवात करत त्यांनी आपल्या २० वर्षाहून अधिक प्रदीर्घ पत्रकारितेच्या कार्यकाळात विविध प्रश्नांना वाचा फोडून खालापूर तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील अनेक बातम्या प्रकाशित करून जनसामान्यांना न्याय मिळवून दिला. शोध पत्रकारितेत त्यांनी दुर्गम व आदिवासी जिल्ह्यातील प्रश्नांना वाचा फोडली असता प्रशांत गोपाळे यांच्या पत्रकारितेतील कार्याची दखल घेऊन अनेकदा त्यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




## शालोपयोगी वस्तु वाटप

। उरण । प्रतिनिधी ।

रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा मराठी व सेमी इंग्रजी माध्यम या विद्यालयात ओएनजीसी प्लांट उरण यांच्या सीएसआर फंडातून विद्यार्थ्यांना स्कूल बॅग आय कार्ड रेनकोट स्कूल युनिफॉर्म स्पोर्ट युनिफॉर्म शूज तसेच विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण योग्यरित्या घेता यावे यासाठी दहा संगणक सेट इन्व्हर्टर एसी इत्यादी साहित्य देण्यात आले.

यावेळी ओएनजीसी प्लांट तर्फे भावना आठवले मॅडम जीएम हेड एच आर इ आर, संजीव मोहन सीजीएम सपोर्ट मॅनेजर अभिषेक पाटील, साद फाउंडेशन तर्फे वामन कांबळे, वंदना, किशोर गमरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका म्हात्रे सुरेखा चंद्रशेखर यांनी प्रास्ताविक केले. नंतर भावना आठवले यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सिताराम नाखवा ज्येष्ठ सदस्य यांनी विद्यालयाची माहिती सांगितली. तसेच ओएनजीसीचे सीजीएम सपोर्ट मॅनेजर संजीव मोहन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नंतर अभिजीत पाटील सरांनी मार्गदर्शन केले आणि साद फाउंडेशनचे संस्थापक वामन कांबळे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना प्रकल्पाबद्दल माहिती सांगितली. सर्व विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानून अध्यक्षांच्या वतीने कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

## सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने महिलांची सुरक्षितता धोक्यात



। उरण । प्रतिनिधी ।

उरणमध्ये अनेक विविध समस्या, प्रश्न प्रलंबित आहेत त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. विशेषत: महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जे उपाय योजना करणे गरजेचे आहेत ते होताना दिसून येत नाही. उरणला अनेक समस्यांनी विळखा घातला आहे. या विविध समस्या वर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षा भावना घाणेकर यांनी आवाज उठविला आहे.

भावना घाणेकर यांनी उरण मधील विविध समस्या संदर्भात पोलीस प्रशासनाचे नवी मुंबई परिमंडळ २ चे उपायुक्त अमित काळे यांची भेट घेतली. चर्चेदरम्यान उरण मधील अतिसंवेदनशील बाबींवर त्यांचे लक्ष वेधले. उरणमध्ये आजही अनेक सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, रस्त्यांवर दिवे नाहीत, उरणमध्ये झालेली हत्या त्याठिकाणी देखील आजसुद्धा सीसीटीव्ही कॅमेरे आणि दिवे नाहीत तसेच उरण रेल्वे स्थानकापासून पुढे शहराकडे येणारा रस्तादेखील नेहमी अंधारमय झालेला असतो. अनेक महिला भगिनी येत जात असतात त्यांना आज देखील तेथे असुरक्षित वाटत असते. उरण मधील अनेक ठिकाणी जसे की लाल मैदान, समुद्र किनारपट्टीचा भाग आणि इतरत्र बसण्यासाठी असलेल्या जागा तिथे रात्रीच्या वेळेस दारू पिण्यासाठी लोक बसलेले असतात त्याठिकाणी देखील सीसीटीव्ही कॅमेरे आणि लाईट्स लावण्याचे आवश्यक असल्याचेही सुचवले.

## पोलादपूरमध्ये महिलांची कार्तिकी एकादशीनिमित्त पायी प्रभातवारी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

शहरातील आदिशक्ती भजन मंडळ, दशानेमा गुजराती महिला मंडळ, दिशा सांस्कृतिक ग्रुप तसेच महिलांनी कार्तिकी एकादशीनिमित्त रविवारी सकाळी काकड आरतीनंतर अभंग आणि विठ्ठलनामाचा गजर करीत पायी प्रभातवारी काढली.

कार्तिक महिन्याच्या पहिल्या दिवसापासून काकड आरती करून देवांना जागे करण्याची प्रथा पोलादपूर शहरात काही महिलांनी अद्याप सुरू ठेवली असून काकडआरतीसाठी दिवाळी पाडव्याला सर्व महिलावर्ग सज्ज होत असतात. रविवारी कार्तिकी एकादशीनिमित्त मारूतीमंदिरापासून पोलादपूर शहरातून श्री सद्‌गुरू राममंगलदास मंदिराकडे सर्व महिलावर्गाने हातीमस्तकी तुळशीचे रोपटे घेऊन विठ्ठलनामाचा गजर करीत पहाटेच पायीवारी काढली. यावेळी अनेक महिलांनी मया विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला।फ अभंगांच्या ओव्यांचे गायन करीत पाऊले मंदिराकडे टाकण्यास सुरूवात केली.



या पायीवारीमध्ये अश्विनी गांधी, प्रिती बुटाला, ज्योत्ना केसरकर, शिल्पा शिंदे, कांचन बुटाला, अश्विनी तलाठी, पालांडे, उज्ज्वला शेठ, कलिका अधिकारी, माई शेठ, शर्मिला बुटाला, स्वाती तलाठी, अश्विनी तलाठी, नीला तलाठी, स्वरूपा तलाठी, सरिता शेठ, कांचन तलाठी, पुष्पा पाटोळे, जोशी वहिनी, श्रावणी शहा, निकिता शेठ, निमा शेठ, लतिका कापडेकर, वैशाली भूतकर, केतकी शेठ, प्रज्ञा शेठ, अस्मिता तलाठी, लता जंगम, वैशाली पांढरकामे, निलीमा सुतार, मालती मधुकर शेठ तसेच असंख्य महिला सहभागी झाल्या.

कार्तिक प्रतिपदेपासून सुरू झालेला काकडा पोलादपूर शहरात त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत सुरू राहणार असून त्रिपुरारी पौर्णिमेला या काकडा सकाळी झाल्यानंतर संध्याकाळी सांगता होणार असल्याची माहिती देण्यात आली.

## नागोठण्यात कार्तिकी एकादशी उत्साहात

। नागोठणे । प्रतिनिधी ।

विठ्ठलभक्तांसाठी पर्वणी असलेल्या दोन मुख्य महा एकादशी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर साजऱ्या केल्या जातात. त्यातील एक असते आषाढ महिन्यातील आषाढी एकादशी आणि दुसरी असते कार्तिकी एकादशी.

आषाढी एकादशी पंढरपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते तर कार्तिकी एकादशीचा उत्सव आळंदीत रंगतो. आणि



ज्या एकादशी नंतर वारकऱ्यांच्या आळंदीकडे जाणाऱ्या पायी दिंडी सोहळ्यांची सुरुवात होते ती कार्तिकी एकादशी नागोठण्यातील श्री विठ्ठल रुक्मिणी व ज्ञानेश्वर मंदिरात रविवारी (दि.२) उत्साहात साजरी करण्यात आली.

नागोठण्यातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील कार्तिकी एकादशी सोहळ्याचा सुरुवात पहाटे ४ वाजता काकड आरतीने झाली.

त्यानंतर पहाटे पाच वाजता विठ्ठल रुक्मिणी व श्री ज्ञानेश्वरांच्या मूर्तीचे पूजन हभप श्री. व सौ. प्रभाकर घोरपडे आणि श्री. व सौ. रोहित जाधव या दोन जोडप्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सकाळी १० वाजता नागोठणे पंचक्रोशी वारकरी सांप्रदाया तर्फे सुमधुर भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## टायर कंटेनरमध्ये परदेशी सापाचा प्रवेश

। उरण । प्रतिनिधी ।

हिंद कंटेनर टर्मिनल येथे एका टायर कंटेनरमध्ये एक परदेशी जातीचा साप आढळून आला आहे. या सापाची ओळख 'कॉर्न स्नेक' किंवा 'रेड रॅट स्नेक' अशी झाली असून हा उत्तर अमेरिकन खंडातील एक विदेशी प्रजातीचा साप आहे.

हा कंटेनर परदेशातून आयात केलेल्या टायरसह उरण बंदर परिसरात पोहोचला होता. तपासणीदरम्यान कर्मचाऱ्यांच्या नजरेस एक वेगळ्या नारंगी रंगाचा, आकर्षक पट्टेरी साप दिसल्याने व्यवस्थापनातर्फे त्वरित बचाव कार्यासाठी फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन )संस्थेच्या स्वप्नील म्हात्रे या स्वयंसेवकास कळविण्यात आले. सदर साप बिनविषारी असून मानवाला कोणताही धोका नसतो. या जातीचे साप प्रामुख्याने पाळीव स्वरूपात ठेवले जातात. तथापि, भारतात अशा परदेशी प्रजातींची उपस्थिती पर्यावरणीय संतुलनाच्या दृष्टीने चिंताजनक मानली जाते.

पान १ वरून

## दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २९९ धावांचे आव्हान

मात्र शफालीला २८ व्या षटकात आयाबोंगा खाकाने बाद केले. शफालीने ७८ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ८७ धावा केल्या. तिच्या विकेटनंतर मात्र दक्षिण आफ्रिकन गोलंदाजांनी पुनरागमन करत भारताला सहजासहजी धावा करू दिल्या नव्हत्या. जेमिमालाही खाकानेच २४ धावांवर बाद केले. कर्णधार हरमनप्रीत कौरला २० धावांवर नॉनकुलुलेको एमलाबाने २० धावांवर त्रिफळाचीत केले, तर अमनजोत कौर १२ धावांवरच नादिन डी क्लर्कच्या गोलंदाजीवर तिलाच झेल देत बाद झाली. मात्र यानंतर दीप्ती शर्मा आणि ऋचा घोष यांची जोडी जमली. या दोघींनी भारतीय संघ ३०० धावांचा जवळ पोहचेल याची काळजी घेतली. त्यांनीही अर्धशतकी भागीदारी केली. यादरम्यान, दीप्तीने या स्पर्धेतील तिसरे अर्धशतकही केले. ऋचाही आक्रमक खेळत होती. पण ४९ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ऋचाला खाकाने बाद केले. ऋचाने २४ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. दीप्ती शर्मा शेवटच्या चेंडूवर धावबाद झाली. दीप्तीने ५८ चेंडूत ५८ धावा केल्या. अखेर भारताने ५० षटकात ७ बाद २९८ धावा केल्या. राधा यादव ३ धावांवर नाबाद राहिली.गोलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेकडून आयाबोंगा खाकाने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. नॉनकुलुलेको एमलाबा, नादिन डी क्लर्क आणि क्लो ट्रायॉन यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. दरम्यान नवी मुंबईतील डॉक्टर डी.वाय. पाटील स्टेडियमवर रविवारी दुपारी होणाऱ्या महिलांच्या एक दिवसीय विश्वचषक अंतिम सामन्यासाठी प्रेक्षकांनी सकाळपासूनच स्टेडियम परिसरात गर्दी केली. महिला विश्वचषकाच्या अंतिम सामन्याकडे लाखो क्रीडा रसिकांचे लक्ष लागले असताना नेरूळ परिसरात पावसाला सुरुवात झाली असली तरी ऊन पावसाचा खेळ मात्र सामना सुरू होण्यापूर्वीच पाहायला मिळाला. दुपारी ३ वाजता सुरू होणाऱ्या महिला क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम फेरीची सर्व तयारी पूर्ण झाली असली, तरी हजारो क्रिकेटप्रेमींचा हिरमोड झाला.

## माजी सभापतींसह सात जणांवर गुन्हा

सौजन्य कानेकर, भावड्या सागर सुर्वे, निरज खेडेकर आणि सुनंदा पवार यांच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११७(२), १८९(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), आणि ३२४(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक खाडे करत असून, हे सर्व पोलीस निरीक्षक रमेश तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. हल्ल्यानंतर पंकज उमासरे यांना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं,मात्र त्यांच्या डोळ्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाल्यामुळे आता त्यांना मुंबईत हलवण्याची तयारी सुरू आहे.दरम्यान, या घटनेनंतर मनसेचे वरिष्ठ नेते महाडमध्ये दाखल होणार असल्याची चर्चा सुरू आहे. आणि त्यामुळे शहरात पुन्हा एकदा राजकीय तापमान वाढले आहे.

## यंदा नोव्हेंबर महिना थंडीचा नाही तर पावसाचा

नोव्हेंबरचा अंदाज सादर केला. यावेळी नोव्हेंबर महिन्यात वायव्य भारताचा काही भाग वगळता देशाच्या अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

याचबरोबर नोव्हेंबर महिन्यात देशातील अनेक भागांत सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. या कालावधीत दक्षिण भारतातील राज्यात सर्वाधिक पाऊस पडतो. यंदा या भागात ७७ ते १२३ टक्के पाऊस म्हणजेच सरासरीइतका समजला जातो. दरम्यान, राज्यात किमान तापमान अधिक राहणार असल्याने नोव्हेंबर महिन्यात फारशी थंडी पडणार नाही. याचबरोबर राज्यासह मध्य भारत, वायव्य भारतात कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

## उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा निश्चित

महागाई, प्रचार साहित्याचे वाढलेले भाव, इंधन दर अशा बाबींचा अंदाज घेऊन राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा वाढवली आहे. त्यात चहा आठ ते दहा रुपये, नाष्टा १५ ते २५ रुपये, जेवण ५० ते ७० रुपये असे दर आहेत. रायगड जिल्ह्यातील काही ग्राम पंचायतींची मुदत जानेवारी २०२६ मध्ये संपणार आहे. शासनाच्या नव्या निर्णयानुसार आता या ग्रामपंचायतींचे सरपंच थेट जनतेतून निवडले जाणार आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने खर्चाची नवी मर्यादा निश्चित केली आहे. सात ते नऊ सदस्याच्या ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी ७५ हजार तर सदस्यांसाठी प्रत्येकी ४० हजार, ११ ते १३ सदस्य असलेल्या ठिकाणी सरपंचपदासाठी दीड लाख तर सदस्यांसाठी ५५ हजार रुपये खर्चाची मर्यादा असेल. तर १५ ते १७ सदस्यांच्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या उमेदवारास दोन लाख ६५ हजार रुपये आणि सदस्य पदाच्या उमेदवारास प्रत्येकी ७५ हजार रुपयांचा खर्च करता येणार आहे.

## चुकीच्या ट्रीगरचा बळीराजाला फटका

हवामान केंद्राच्या माहीतीच्या आधारे व योजनेच्या शासन निर्णयानुसार जे ट्रीगर आहेत. त्यानुसार विमा रक्कम निश्चित करून शेतकऱ्यांच्या खात्यात आजमितीस विमा रक्कम जमा होणे आवश्यक होते. दुर्दैवाने जिल्ह्यात कोणत्या मंडळास किती विमा रक्कम निश्चित झाली आहे? याबाबत कंपनीने व्हॉट्सअपव्दारे दिलेल्या माहितीची तपासणी केली असता निश्चित केलेली विमा रक्कम शासन निर्णयानुसार निश्चीत केलेले ट्रिगर व स्कायमेट कडून प्राप्त हवामानाचा डाटा यावरून निश्चित केलेली रक्कम यांच्यात विसंगती दिसून आल आहे.स्कायमेटकडून प्राप्त हवामानाच्या माहीतीच्या आधारे पुनश्चः तपासणी करून अचूक विमा रक्कम निश्चित करावी व शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करणेबाबत कार्यवाही करावी अशी विनंती जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी रायगड यांनी संचालक कृषी आयुक्तालय पुणे यांच्याकडे व युनिव्हर्सल सॅम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीकडे केली आहे.या पत्राच्या आधारे महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी विनयकुमार आवटे, संचालक, नियोजन व प्रक्रिया कृषी आयुक्तालय पुणे यांच्याशी या जिव्हाळ्याच्या विषयासंबंधी दुरध्वनीवर संपर्क साधला असता पुनर्पडताळणीमुळे शेतकऱ्यांना पूर्वीच्या तुलनेने अधिक पैसे मिळतील तसेच पुनर्पडताळणीत सर्व ट्रिगरची अंमलबजावणी करण्याबाबत कंपनीला सुचना देण्यात आल्याचे देखील त्यांनी मोकल यांना सांगितले.

## विरार-अलिबाग कॉरिडोअरला बीओटीचा आधार

एमएसआरडीसीने बीओटीवर प्रकल्प राबविण्यासंबंधीचा व्यवहार्यता अभ्यास केला असून हा प्रकल्प व्यवहार्य ठरला आहे. त्यानुसार व्यवहार्यता अभ्यासाचा प्रस्ताव १५ दिवसांपूर्वी राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आल्याची माहिती एमएसआरडीसीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली. राज्य सरकारकडून या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर बीओटी तत्वावर या मार्गिकेतील पहिल्या टप्प्याच्या बांधकामासाठी निविदा काढण्यात येणार आहेत. निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्यासाठी किमान सहा महिने लागण्याची शक्यता आहे. दुसरीकडे भूसंपादनाच्या कामालाही आता वेग देण्यात येणार आहे.

## भातखरेदीला होणार विलंब

लागली होती. पिके नुकतीच काढणीस तयार होत असतानाच ऑक्टोबर महिन्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला. परिणामी अनेक शेतकऱ्यांचे पीक ओलाव्यामुळे खराब झाले. सध्या शेतकरी उरलेले पीक वाचविण्याच्या प्रयत्नात असून, भात वाळविण्यासाठी उन्हाची प्रतीक्षा करीत आहेत. भातामध्ये अद्याप आर्द्रता असल्याने सुकवणी न झाल्यास भातखरेदी प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या सुरू करता येणार नाही. त्यामुळे जिल्ह्यातील खरेदी केंद्रांना उशिरा सुरुवात करावी लागणार आहे. सुरक्षित आणि दर्जेदार भात उपलब्ध झाल्यावरच टप्प्याटप्प्याने खरेदी केंद्रे सुरू करण्याचा फेडरेशनचा विचार आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी यावर्षीदेखील २८ केंद्रे कार्यरत राहणार असून, ती वाहतूक आणि साठवणुकीच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी ठेवण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना आपल्या भाताची विक्री शासकीय खरेदी केंद्रांवर करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. ही नोंदणी प्रक्रिया पुढील दोन ते तीन दिवसांत सुरू होईल, अशी माहिती के. टी. ताटे यांनी दिली. दरम्यान, पावसाचा अंमल कायम राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. नुकसानीतून सावरत असतानाच भातखरेदी उशिरा होणार असल्याने आर्थिक फटका बसू शकतो, असे मत स्थानिक शेतकरी व्यक्त करीत आहेत. तरीही शासनाने वेळेत खरेदी सुरू करून मदतीच्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मच्छिमारांची होणार जनगणना

टॅबवर आधारित या ॲपची निर्मिती केली आहे. या ॲपमुळे मासेमारी केंद्रे, बंदरांची माहिती, मासेमारी केली जाणारी गावे यांची माहिती पडताळण्यास मदत होणार आहे. ॲपचे पर्यवेक्षणाच्या कामाची जबाबदारी सीएमएफआरआय, भारतीय मासेमारी सर्वेक्षण विभाग आणि किनारी राज्यातील मत्स्यव्यवसाय विभागातील कर्माचाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. ही जनगणना डिजीटल पद्धतीने केली जाणार असून, सुमारे ३ हजार ५०० सागरी मच्छीमार गावे आणि १२ लाख कुटुंबाचा त्यात समावेश करण्यात येणार आहे.जनगणनेचा मुख्य उद्देश मच्छीमारांची लोकसंख्या, सामाजिक-आर्थिक स्थिती, मासेमारीसाठी वापरली जाणारी साधने, मासेमारीशी संबंधित पायाभूत सुविधा या दस्तऐवजीकरण करणे आहे.ही जनगणना ३ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे.महाराष्ट्रात सुमारे ५२६ सागरी मच्छीमार गावे आहेत. सागरी मच्छिमार गावांच्या संख्येनुसार देशात महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे.

## रत्नागिरीत पकडली तीन कोटींची अंबरग्रीस

माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक नितीन ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने बाफना मोटर्सच्या शेजारी सापळा रचला. या ठिकाणी छापा टाकून तीन आरोपींना कोणत्याही परवानगीशिवाय, विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने अंबरग्रीस बाळगताना पकडले. यामध्ये रोहित रमेश चव्हाण (रा. आंबेशेत), आसिफ अस्लम मोरस्कर (रा. पिंपरी बुद्रुक, चिपळूण), तेजस परशुराम कांबळे (रा. आडरे, चिपळूण) या आरोपीचा समावेश आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांधई ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे. या मिळकतींचे मालक जयराम रामचंद्र कोळंबे वगैरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|
| ५३/२२ | ००.३०.०० | ०.३३ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक - ०३ नोव्हेंबर २०२५

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हो. सौ. लि. कोतवालनगर
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१
मो.नं. ९५२७२८२५२५

## निवडक



कार्तिकी एकादशी निमित्त पनवेल येथील जुना भाजीपाला मार्केट परिसरात असलेल्या सुमारे तीनशे वर्षे जुन्या विठ्ठल रखुमाई मंदिरात सकाळपासून भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. (छायाचित्र : राजेश डांगळे)



### वारकऱ्यांकडून पायी दिंडीचे आयोजन

**पाताळगंगा** : रायगड जिल्हातील बोंबल्या विठोबा यात्रा म्हणून प्रसिद्ध असलेल्या साजगाव यात्रेस कार्तिकी एकादशीपासून प्रारंभ झाला आहे. तालुक्यासह जिल्हातील वारकरी संप्रदायांकडून विठू रायाच्या चरणी लीन होण्यासाठी पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी खालापूर तालुक्यातील तळवली गावातील वारकऱ्यांनी देखील पायी दिंडीचे आयोजन केले. ही पायी दिंडी अंबिवली ( माजगांव ) येथे येताच माजगांवचे सरपंच राजेश पाटील, मंगेश पाटील, नितिन काठावले, अन्वी जाधव, संदेश जाधव यांच्या हस्ते या दिंडीचे स्वागत करण्यात आले. यावेळी मधुकर मालकर, एम.के. गडगे, अनिल मालकर, देविदास मालकर, जे.के.मालकर, महेंद्र मालकर,भरत मालकर, संतोष मालकर, रामदास मालकर यांच्यासह शेकडो वारकरी या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. तसेच, आंबिवली तील ग्रामस्थ या ठिकाणी उपस्थित होते.



### म्हसळा तालुक्यात एकादशीचा उत्साह

**म्हसळा** : संपूर्ण महाराष्ट्रात कार्तिकी एकादशी साजरी करण्यात येत असतांना म्हसळा तालुक्यातील बनोटी गावात साक्षात पंढरी अवतरल्याचे काहिसे चित्र पहायला मळिाले. यावेळी येथील विठ्ठल रखुमाई मंदीराला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. सकाळपासूनच काकड आरती, विठ्ठल रखुमाई मूर्तीवर दुग्धाभिषेक, महादिंडी सोहळा, पालखी मिरवणूक, भजन किर्तन, सायंकाळी पारंपारिक शक्ती-तुरा जंगी सामना अशा भरघोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे बनोटी गावात अतिशय भक्तीमय वातावरण निर्माण होऊन सर्व भाविक पांडुरंगाच्या चरणी लिन झाले होते. या सोहळ्याला स्थानिकांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### उरणमध्ये कार्तिकी एकादशी उत्साहात

**उरण-पनवेल** : कार्तिकी भागवत एकादशी निमित्ताने रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील प्रतिपंढरपूर म्हणून सम जल्या जाणाऱ्या भेंडखळ गावात दरवर्षीप्रमाणे कार्तिकी भागवत एकादशीचा उत्सव अतिशय उत्साहामध्ये साजरा करण्यात येते. यावेळी भजन, कीर्तन आणि विठ्ठल-रखुमाईच्या भव्य पालखीचे आयोजन भेंडखळ ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भक्तांनी विठ्ठल-रखुमाई मंदिरात विठूरायाचे दर्शन घेतले.दरम्यान, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी रविवारी (दि.२) कार्तिकी भागवत एकादशीनिमित्त विठू माऊलीचे दर्शन घेतले.

# बदलत्या ऋतुमानाचा पक्ष्यांना फटका

## स्थलांतरित पक्ष्यांची संख्या रोडावली; अन्नासाठी दाही दिशा वणवण

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

**लांबलेला पाऊस व बदलत्या ऋतुमानाचा फटका जिल्ह्यातील पक्षांना आणि प्रामुख्याने स्थलांतरित पक्ष्यांना बसला आहे. त्यामुळे पक्षांच्या जीवन चक्रावर देखील परिणाम झाला आहे. पक्ष्यांना घरटे बांधण्यास बाधा आली आहे. त्याचबरोबर पक्षांच्या अन्नाचे स्रोत कमी झाल्याने त्यांना अन्नासाठी दाही दिशा भटकावे लागत आहे. तसेच, हिवाळ्यात येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात रोडावत चालली आहे. पक्षी अभ्यासक व निरीक्षकांनी याबाबतच्या नोंदी घेतल्या आहेत.**



गेल्या दोन-तीन दशकांपासून निसर्गामध्ये अपरिमित असे बदल झाल्यामुळे प्रत्येक ऋतू हा बदलत चालला आहे आणि त्यांचा कालावधी सुद्धा बदलत आहे. मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस नोव्हेंबर महिना उजाडला तरी सुरूच आहे. शिवाय हवामानात प्रचंड दमटपणा व ओलावा आहे. या प्रतिकूल वातावरणाचा परिणाम पक्षांच्या एकूणच आरोग्यावर पडताना दिसत आहे. खरंतर नोव्हेंबर महिन्यापासून थंडीला सुरुवात होते किंवा थंडीसाठी पोषक वातावरण बनते. त्यामुळे उत्तरेकडील बफार्ळ प्रदेशातील स्थानिक पक्षी उदरनिर्वाह करिता स्थलांतरित करायला सुरुवात करतात. पश्चिम भारत किंवा दक्षिण भारतात ते हजारो किलोमीटरचा प्रवास करून दाखल होतात. असेच काही पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होतात.

पाऊस संपल्या नंतर ऑक्टोबर महिन्यापासून वाढलेले गवत आणि या गवतावरील कीटक म्हणजे या पक्षांसाठी खाद्याचे भांडार असते. हिवाळ्याच्या दिवसात कीटकवर्गीय जीवांना मुबलक प्रमाणात खाण्यासाठी गवत असल्या कारणाने अनेक कीटक, फुलपाखरे, सरपटणारे जीव गवताच्या आणि झाडांच्या पानांच्या सानिध्यात आपली अंडी देतात. अगदी नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला या कीटकांची, फुलपाखरांची आणि सरपटणाऱ्या विविध जीवांची पिल्ले वाढलेल्या गवतावर आणि गवताच्या सानिध्यात दिसून येतात. हा कालावधी व वातावरण त्यांच्या वाढीसाठी पोषक असतो. परंतु, सतत पडणाऱ्या पावसामुळे त्यांच्या जीवनचक्रात अनियमित बदल घडले आहेत. जोरदार पाऊस व वादळामुळे गवत आडवे पडले असून गवत ओलसर होऊन कुजल्यामुळे सरपटणारे जीव व कीटक बऱ्याच प्रमाणात मरण पावत आहेत. याचा परिणाम पक्ष्यांवर झाला आहे.

> **“परतीच्या वादळी पावसामुळे स्थलांतरित पक्ष्यांची व येथील स्थानिक पक्ष्यांची देखील मोठी वाहतात झाली आहे. त्यांच्या स्थलांतराच्या चक्रावर मोठा परिणाम झाला आहे. तसेच, पाऊस लांबल्याने पक्षांच्या आरोग्यावर हवामानाच्या बदलांचा प्रतिकूल परिणाम होतो. सततच्या पावसाम ुळे पक्ष्यांना निवारा शोधणे कठीण जाते. पावसात भिजल्याने अनेक पक्षी आजारी किंवा मरण पावतात, तर ढगाळ वातावरणामुळे कित्येक पक्षांची उपासमार होत असते. समुद्रकिनाऱ्यानहून अनेक आजारी पक्षी तसेच काही पक्षी नरमलेल्या अवस्थेत आढळून येत आहेत.**
> **-शंतनु कुवेसकर, पक्षी व निसर्ग अभ्यासक, माणगाव”**

**घरट्यांना बाधा**

बरेचसे पक्षी डिसेंबर व मे महिन्यात अशी साधारण दोन वेळा घरटी बांधतात. पावसाळ्याच्या आगमनापूर्वी पक्षी आपली घरटी बांधून पूर्ण करतात. तसेच, नोव्हेंबरमध्ये काही पक्षांची घरटी बांधण्याची लगबग सुरू आहे. मात्र, परतीच्या वादळी पावसामुळे या घरट्यांना बाधा पोहोचली आहे. विशेषतः घरटी बांधणाऱ्या पक्षांची घरटी वादळी पावसामुळे खाली कोसळली. तर, काही घरटी अपूर्ण राहिली आहेत.

**दख्खनकडे स्थलांतरीत**

परतीचा पाऊस सतत सुरू राहिला तर अनेक पक्षी दख्खनकडे म्हणजे पुण्याकडे स्थलांतरित होतात. या स्थलांतरामध्ये देखील त्यांची परवड होते. परंतु, स्थलांतराशिवाय त्यांच्याकडे पर्याय नसतो, कारण त्यांना चांगल्या निवाऱ्याची व हवामानाची आवश्यकता असते.

## आवास यात्रेवर पावसाचे विरजण..



अलिबाग तालुक्यातील आवास येथील श्री नागेश्वर मंदिर परिसरात मंगळवारी (दि.४) वैकुंठ चतुर्थी निमित्त मोठी यात्रा भरते. परंतु, यावेळी पावसामुळे या यात्रेवर पावसाचे विरजण आले आहे. सर्वत्र चिखल झाल्याने दुकानदारांना त्याचा फटका बसणार आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

## सायबर सुरक्षा जनजागृती अभियान

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उलवे पोलिसांकडून दोन महत्त्वाचे उपक्रम राबवण्यात आले. एकीकडे सायबर गुन्ह्यांपासून जनजागृतीसाठी ‘सायबर सुरक्षा जनजागृती अभियान’ राबवण्यात आले. तर, दुसरीकडे कायदा व सुव्यवस्था नियंत्रणासाठी ‘दंगा काबू’ योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी उलवे पोलिसांच्यावतीने रिलायन्स डिजिटल मॉल येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

वरिष्ठ पोलीस निरिक्षक अर्जुन रजाने यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अनिल राजुरे, एएसआय साळवे यांनी सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात नागरिकांना मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन शॉपिंग, सोशल मीडिया फ्रॉड, मालवेअर, फोन पे, गुगल पे फसवणूक, ऑनलाइन ट्रेडिंग आणि डिजिटल अरेस्ट फ्रॉड यासारख्या वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देण्यात आली. या जनजागृती मोहिमेत रिलायन्स डिजिटल मॉलचे ४० कर्मचारी सहभागी झाले होते.

त्यानंतर सेक्टर ५ जिओ टॉवर परिसरात ‘दंगा काबू’ योजनेअंतर्गत रंगीत तालीम घेण्यात आली. या सरावात उलवा पोलीस ठाण्याचे १ पोलीस निरीक्षक, ४ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ३० पोलीस अंमलदार, तसेच सिडको अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच कोपर हॉस्पिटलची रुग्णवाहिकेचे पथक सहभागी झाले होते.

## डॉ. बाबासाहेब देशमुख यांची शिंग्रोबा मंदिराला भेट



| खोपोली | प्रतिनिधी |

बोरघाटाचे जनक म्हणून ओळखले जाणाऱ्या वीर हुतात्मा शिंग्रोबा देवाचे मंदिर बोरघाटात आहेत. या मंदिराला शेकापचे सांगोला मतदार संघांचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमूख यांनी भेट देत दर्शन घेतले. गेल्या दीडशे वर्षांपूर्वी इंग्रजाना या घाटमाथ्यावरील बोरघाटात रस्ता दाखविणारे शिंग्रोबा धनगर होते. परंतु, त्यांना इंग्रज अधिकाऱ्यांनी गोळ्या घालून ठार मारले. ज्या ठिकाणी शिंग्रोबाना ठार मारले त्या ठिकाणी शिंग्रोबाचे मंदिर बांधले. त्यामुळे मुबंई-पुणे एकमेकांना आज जोडले गेले आहे. त्यामुळे सरकारने मुबंई-पुणे महामार्गावरील तयार करण्यात आलेल्या मिसिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर असे नाव द्यावे, अशी मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमूख यांनी मुख्यमंत्रयांकडे केली आहे. यावेळी दत्ताभाऊ शेडगे, नितीन कराडे, विष्णू देशमुख आदिंसह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

# जिल्हापरिषदेच्या पत्राला केराची टोपली

## अधिकाऱ्यांकडून शेकापच्या तक्रारीची दखल

| पनवेल | प्रतिनिधी |

ग्रामपंचायत माध्यमातून लाखो रुपये खर्च करून करण्यात आलेल्या कामांची तक्रार शेकापकडून करण्यात आली आहे. शेकापकडून करण्यात आलेल्या तक्रारीची दखल घेत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पनवेलच्या गटविकास अधिकाऱ्यांवर लेखी पत्राद्वारे नाराजी व्यक्त केली आहे.

पाच महिन्यांपूर्वी अर्ज करूनही विचुंबे ग्रामपंचायतीने केलेल्या कामांची चौकशी करून अहवाल सादर केला जात नसल्याबाबत पनवेल पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना लेखी पत्र देऊन अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे म्हटले आहे. विचुंबे ग्रामपंचायतीकडून होणाऱ्या विकासकामांच्या दर्जाबाबत नेहमीच तक्रारी असतात. ग्रामपंचायतीच्या खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. परंतु, स्थानिक राजकारणामुळे याचा पाठपुरावा केला जात नाही. शेकापचे पदाधिकारी पुरुषोत्तम भोईर यांनी विचुंबे ग्रामपंचायतीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मे मध्ये भोईर यांनी विचुंबे गावात झालेल्या विकासकामांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च पर्यंतच्या विकासकामांवर शंका उपस्थित करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या सदस्यांना देण्यात आलेल्या इतिवृत्तातून मळिालेल्या माहितीवर शंका उपस्थित करून या प्रकाराची चौकशी त्यांनी केली आहे. दरम्यान, काही कामांबाबत खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिक म्हणून पुरुषोत्तम भोईर यांनी केली होती. परंतु, त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली नाही. भोईर यांनी यासाठी पाच महिने पाठपुरावा केला. परंतु, त्यांच्या अर्जाची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे तक्रारदार भोईर यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची भेट घेऊन तक्रार अर्जाचे गाऱ्हाणे मांडून तीव्र नाराजी व्यक्त केली.

नेहा भोसले यांनी १६ ऑक्टोबर रोजी गटविकास अधिकारी समीर वठारकर यांना लेखी पत्र पाठवून कामकाजावर नाराजी व्यक्त केली. पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांना वेळोवेळी फोनद्वारे कळवून अहवालाची मागणी केली. परंतु, त्यांच्याकडूनही दाद मळिाली नाही. त्यामुळे या विकासकामांमध्ये काही गौडबंगाल आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# पनवेलमध्ये ५० लाखांची फसवणूक

| पनवेल | प्रतिनिधी |

स्टॉक मार्केटिंगबाबत माहिती देणार असून त्यात ट्रेडिंग करण्यास सांगून ५० लाख १७ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी प्रगती बगाडिया या महिलेविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विश्वजीत बसक हे खारघर सेक्टर ४ येथे राहत असून त्यांना प्रगती नावाच्या महिलेकडून स्टॉक मार्केटिंगबाबत माहिती देणार असल्याचा मेसेज आला. यावेळी ते व्हाट्सअप वर बोलू लागले. त्यांना लिंक पाठवून फॉर्म भरण्यास सांगितला. त्यानंतर एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगितला.

यावेळी खात्यामध्ये १० हजार रुपये पाठवले. त्यानंतर ५० लाख रुपये इन्वेस्ट करा आणि रकमेच्या २० टक्के नफा मळिेल, असे सांगितल्याने त्यांनी पैसे पाठवले. त्यांना ८६ लाख रुपये नफा दाखवला. परंतु, पैसे काढण्यास गेले असता पैसे काढता येणार नाहीत. त्यामुळे आणखी ५० लाख रुपये इन्वेस्ट करा मग पैसे येतील, असे सांगितल्यानंतर त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

## तरूणाची आत्महत्या

**पनवेल** : करंजाडे वसाहतीमध्ये फॅनला साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. अविनाश बोराडे (३८) असे या तरूणाचे नाव असून त्याने कोणत्यातरी अज्ञात कारणाने आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



# ‘कामोठे पोलिसांच्या तपासावर विश्वास’

| पनवेल | प्रतिनिधी |

कामोठे पोलिसांच्या तपासावर आम्हाला पूर्व विश्वास असून ते दागिने चोरणाऱ्या आरोपींचा शोध लावलीत, असे प्रतिपादन कामोठे वसाहतीमध्ये राहणाऱ्या दिघे कुटुंबीयांनी पत्रकार परिषदेमध्ये केले.

कामोठे वसाहतीमधील गिरीजा सोसायटी प्रतीक जेम्समध्ये राहणाऱ्या सविता म्हस्कर यांच्या घरातील ४० दिवसांपूर्वी लाखो रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. या चोरी संदर्भात त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदमध्ये त्यांच्या घरा समोर राहणाऱ्या दिघे कुटुंबियांवर संशय व्यक्त केला आहे. या संदर्भात दिघे कुटुंबीयांनी आपली बाजू मांडताना आज पत्रकार परिषद घेत म्हस्कर कुटुंबीयांनी केलेले आरोप हे बिनबुडाचे असून त्या कुटुंबियांसोबत आमचे गेल्या अनेक वर्षांपासून कौटुंबीक संबंध होते. या संबंधामुळे त्यांनी त्यांच्या घराच्या चाव्या आमच्याकडे अत्यावश्यक वेळेसाठी ठेवत होते. त्यामुळे त्यांचे म्हणणे आहे की, चोरी आम्ही केली असावी. मात्र, चोरी झाल्यापासून आम्ही त्यांच्या बरोबरच होतो. त्यांनी या पूर्वी त्यांच्याकडील सोन्याचे दागिने आम्हाला दाखवले होते. परंतु, या चोरी संदर्भात आमचा कोणताही संबंध नाही. पोलीस ठाण्यात तक्रार करण्यास आम्ही त्यांच्या बरोबरच होतो. गेल्या महिना भरापासून पोलिसांच्या चौकशीला आम्ही सामोरे जात आहोत. आमचे सीसीटीव्ही फुटेज, बँक खाते व आवश्यक असणाऱ्या सर्व माहिती आम्ही वेळोवेळी पोलिसांना दिल्या आहेत, असे शंतनू दिघे व मोनिका दिघे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

**विस्तारिकरणाच्या कामासाठी स्थलांतर** | **अनेक व्यवसायिकांना आर्थिक फटका**

# कळंबोली मॅकडोनाल्ड थांबा हलला

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

**प्रवाशांची होणारी गर्दी पाहून अनेक लहान मोठ्या विक्रेत्यांनी कळंबोली मॅकडोनाल्ड या राज्य परिवहन मंडळाच्या बस थांब्याच्या ठिकाणी आपले व्यवसाय थाटले होते. त्यामुळे दररोज या ठिकाणी लाखो रुपयांची उलाढाल होत होती. आता मात्र हा थांबा दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात आला आहे. याचा परिणाम या ठिकाणी वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्याच्या व्यवसायांवर झाला असून, अनेकांना याचा आर्थिक फटका बसला आहे.**



सायन - पनवेल महामार्गावरील कळंबोली सर्कलच्या विस्तारिकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच, नवी मुंबई विमान तळावर जाणाऱ्या वाहणांची संख्या भविष्यात वाढणार आहे. त्याचा विचार करून कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांनी कळंबोली मॅकडोनाल्ड येथील थांबा के. एल.ई. कॉलेज येथे हलवण्याची मागणी राज्य परिवहन विभागकडे पत्राद्वारे केली होती. भोसले यांनी केलेल्या मागणीची दखल घेत हा हलवण्यात आला असून, १ नोव्हेंबरपासून नव्या थांब्यावर बस थांबवल्या जात आहेत.

दरम्यान, राज्य परिवहन मंडळाकडून कळंबोली मॅकडोनाल्ड येथे बस प्रवाशांसाठी थांबा उपलब्ध करून देण्यात आला होता. या थांब्यावर दररोज जवळपास ७५ शिवनेरी बस प्रवासी घेण्यासाठी थांबा घेत होत्या. तसेच, या ठिकाणी बेकायदेशीर प्रवासी वाहतूक खाजगी वाहन देखील उभी राहत होती.

रात्रंदिवस उभ्या राहणाऱ्या वाहणांमुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. दररोज थांबणाऱ्या वाहनांमुळे प्रवाशांची देखील या ठिकाणी मोठी गर्दी होत असल्याने अनेक विक्रेत्यांनी आपले लहान मोठे व्यवसाय या ठिकाणी थाटले होते. थांबा इतरत्र हलवण्यात आल्याने या विक्रेत्यांना आता आर्थिक फटका सहन करावा लागणार आहे.

**वाहतूक पोलिसांकडून कारवाई**

थांबा हलवण्यात आल्या नंतरही प्रवासी या ठिकाणी गर्दी करत असल्याने अनेक खाजगी बस चालक या ठिकाणी आपली वाहन थांबवत आहेत. वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांडून अशा वाहन चालकांवर कारवाई करण्यात येत आहे. तर, वाहन उभी राहू नये या करता वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांना खासगी मदतनीस देखील देण्यात आले असून, वाहनचालकांनी वाहन उभी करू नये, या करता लाऊडस्पीकरवरून सूचना देखील या ठिकाणी करण्यात येत आहेत.

**विक्रेत्यांची नव्या थांब्याकडे धाव**

थांबा नव्या जागेत हलवण्यात आल्याने अनेक विक्रेत्यांनी नव्या थांब्याकडे धाव घेतली आहे. त्यामुळे मागील दोन दिवसापासून सायंकाळी आणि रात्रीच्या सुमारास नव्या बस थांब्यावर वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. त्यामुळे अशा विक्रेत्यांवर चाप बसवण्याचे काम पालिकेच्या अतिक्रमण विभागाला करावे लागणार आहे.

# आर्याच्या मृत्यूची भानगड

मुंबईतील ओलिसनाट्य आणि त्याच्या शेवटी रोहित आर्य नावाच्या इसमाला पोलिसांनी घातलेली गोळी या प्रकरणातून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकार खासगी मंडळींना विविध कार्यक्रमांच्या प्रसिध्दीच्या नावाखाली कशी कोट्यवधी रुपयांची खिरापत वाटत असते हे या निमित्ताने ठळकपणे पुढे आले आहे. या प्रकरणातले गुजरात कनेक्शनही लक्षात घेण्यासारखे आहे. रोहित आर्य हा मूळचा गुजरातच्या आणंदम धला रहिवासी होता. तिथून तो इकडे येतो काय आणि शैक्षणिक कार्यक्रम आणि चित्रपट तयार करण्याच्या नावाखाली आपले बस्तान बसवतो काय, सगळेच गमतीशीर आहे. सरकारी खात्यासोबत कोणताही प्रकल्प करणे आणि त्या खात्यातून पैसे काढून घेणे हे सामान्य कोणालाही जमत नाही. तिथे टक्केवाल्यांची पावले टक्केवाले बरोबर ओळखतात. त्यानुसार हा आर्य गेल्या दहा वर्षात आपल्या सरकारशी संधान बांधून होता. शाळांतील मुलांमध्ये स्वच्छतेच्या सवयींचा प्रसार करणे, कचरा फेकू नये, थुंकू नये वगैरे गोष्टींचा प्रचार करण्यासाठी मुलांनीच असे करणाऱ्यांचे व्हिडियो तयार करणे असे उपक्रम या आर्याने हाती घेतले होते. स्वच्छता मॉनिटर असे नाव त्याने त्याला दिले. त्यानुसार २०२२ मध्ये त्याने पायलट प्रकल्प केला. काही ठराविक शाळांमध्ये आपल्या खर्चाने त्याने तो करावा असे ठरले. ज्याअर्थी त्याने तो केला त्याचे अर्थ दोन. या प्रकल्पाच्या आधारे त्याला पुढचे कंत्राट दिले जाईल असे आश्वासन मिळाले. किंवा सरकारातीलच कोणीतरी आर्याच्या पुढच्या प्रकल्पांसाठी ही पायवाट तयार करीत होता. पहिल्या वर्षीचा प्रकल्प झाल्यावर सरकारने माझी शाळा, सुंदर शाळा ही योजना सुरू केली. एरवीही सगळ्या लोकांना शाळा खात्यात प्रयोग करण्याची फार सुरसुरी असते. विद्यार्थी व अध्यापक हे त्यांना प्रकल्प राबवण्यासाठी हक्काचे कलाकार वाटतात. त्यातच तेव्हा शाळा खात्याचा कारभार दीपक केसरकर नावाच्या चमको मंत्र्यांकडे होता. वह्या आणि पुस्तके एकत्रच करण्याची एक भानगड त्यांनी काढली होती. शिवाय, शाळा सुरू होऊन बरेच दिवस झाल्यानंतर त्यांनी सर्व सरकारी शाळांचे गणवेश सरकार पुरवेल अशी टूम काढली.

## केसरकरांची चौकशी करा

अशा योजना राबवण्यासाठी अर्थातच नेहमी कंत्राटदारांमार्फत राबवल्या जात असतात. त्यानुसार बालभारतीकडून छपाई काढून घेऊन बाहेरच्या लोकांना वही व पुस्तकाची एकत्रित छपाई दिली गेली. शिवाय गणवेशांचेही मोठे कंत्राट दिले गेले. पण त्यात भयंकर घोळ झाले. गणवेशाची योजना पुढे ढकलावी लागली. गेल्या वर्षी फडणवीस मुख्यमंत्री झाल्यावर केसरकरांचे मंत्रिपद गेले व या दोन्ही योजना बासनात गुंडाळून ठेवण्यात आल्या. याच धर्तीवर माझी शाळा सुंदर शाळा योजना राबवली गेली असे दिसते. त्यासाठी आर्यासारख्या लोकांना हाताशी धरले गेले. आर्याचे म्हणणे असे होते की त्याला दोन कोटी रुपये देण्याचे कबूल केले गेले. तर शाळा खात्याने आता असा खुलासा केला आहे की, आर्याच्या कंपनीने त्यासाठी चित्रपटांचे प्रदर्शन करणे, शाळांमधून कार्यक्रम घेणे आवश्यक होते. त्यासंबंधीची कागदपत्रे, पुरावे, पावत्या देणे आवश्यक होते. आर्याने हे न केल्याने त्याचे पैसे थांबवण्यात आले. त्यातच आर्याने ही योजना मंजूर झाली आहे असे गृहित धरून परस्पर शाळांकडून पैसे घ्यायला सुरुवात केली. ते गैर होते. त्याला नोटीस बजावण्यात आली व हे पैसे सरकारला परत करण्यास सांगण्यात आले. आर्याचे म्हणणे असे होते की त्याला कबूल केलेले पैसे सरकारकडून येईनात म्हणून त्याला शाळांकडून पैसे गोळा करणे भाग पडले. यामध्ये नेमके कोण खरे बोलते आहे हे ठरवणे कठीण आहे. पण यामध्ये केसरकरांनी केलेला खुलासा भ्रष्टाचाराचा संशय निर्माण करणारा आहे. आर्या आर्थिक अडचणीत सापडल्याने आपण वैयक्तिकरीत्या त्याला चेकने पैसे देऊन मदत केली होती असे केसरकरांनी म्हटले आहे. शाळा खात्याच्या मते आर्याने नियमांची पूर्तता न केल्याने पैसे दिले गेले नव्हते. असे असूनही एक मंत्री स्वतःच्या खिशातून त्याला मदत करतो हा अजब प्रकार आहे. इथे काहीतरी पाणी मुरते आहे. दरम्यान, उदय सामंत, एकनाथ शिंदे यांच्यासोबतचे या आर्याचे फोटोही आता सोशल मिडियात फिरत आहेत. ते पाहता शिंदे गटाच्या लोकांशी या आर्याची चांगलीच घसट निर्माण झालेली दिसते. या सर्व भानगडीची फडणवीसांनी खोलात जाऊन चौकशी करायला हवी.

## संयमाचे आणखी स्फोट होतील

आर्याने चित्रपटाचे चित्रीकरण करायचे आहे या नावाखाली मुंबईतल्या पवई इथे एका स्टुडियोत मुलांना जमवले व त्यांना ओलिस ठेवले. त्याचे हे कृत्य गुन्हेगारी स्वरुपाचेच होते. त्याची मनस्थिती कितीही खराब असली तरी त्याने मुलांना अशा रीतीने दहशतीखाली ठेवणे व मारण्याची धमकी देणे हे गैर होते. त्याच्या पैशांशी मुलांचा काहीही संबंध नव्हता. त्यामुळे त्याला कठोर शिक्षा होणे आवश्यकच होते. पण त्याला गोळी मारणे हाच पर्याय होता काय हा मात्र प्रश्न आहे. आर्या जिवंत राहिला असता तर त्यातून शिंदे गटाशी संबंधित अनेकांच्या भानगडी बाहेर आल्या असत्या म्हणून त्याला संपवले गेले की काय हे तपासले जायला हवे. अशा प्रसंगांमध्ये ओलिस ठेवणाऱ्याला निःशस्त्र करून कसे ताब्यात घ्यावे याचे प्रशिक्षण घेतलेले कमांडो आपल्यापाशी आहेत. पोलिस दोन-तीन तासांपासून आर्याच्या संपर्कात होते. असे असूनही त्याला अंतिमतः ठार करण्यात आले हा प्रकार संशयास्पद आहे. बदलापूर शाळेतील मुलींवर अत्याचाराचा आरोप असणाऱ्या इसमालाही असेच गोळ्या घालून मारण्यात आले होते. शेवटी त्या घटनेची दखल घेऊन पोलिसांवर फिर्याद दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. आर्याचा प्रकार असाच तर नाही ना हे पाहायला हवे. या आर्याने यापूर्वीही मुंबईत व पुण्यात पैसे मिळवण्यासाठी धरणे आंदोलन केले होते. त्यावेळी त्याच्याकडे दुर्लक्श करण्यात आले. त्यामुळे त्याने हा मार्ग पत्करला. या प्रकरणाने महाराष्ट्र सरकारचे पुरते दिवाळे वाजले आहे हे आणखी एकदा स्पष्ट झाले. लाडकी बहीण योजनेमुळे तिजोरी खलास झाली आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी कसाबसा पुढचा वायदा करण्यात आला आहे. सरकारी कंत्राटदारांचे जवळपास ८९ हजार कोटी रुपये थकले आहेत. यापूर्वी सांगलीच्या एका कंत्राटदाराने दीड कोटी रुपये न मिळाल्याने आत्महत्या केली होती. आता आर्याने इतरांना ओलिस धरून शेवटी स्वतःचा अंत ओढवून घेतला. या दोन्ही प्रकरणातले पाप शिंदे, फडणवीस व अजितदादांचे आहे. निवडणुका जिंकण्यासाठी वाटेल तसे पैसे उधळले आणि आता देणी भागवताना नाकी नऊ येत आहेत. इतके असूनही सरकारचा डामडौल आणि नखरे कमी झालेले नाहीत. साहजिकच ज्यांचे पैसे येणे आहेत त्यांचा संयम संपत चालला आहे. फडणवीसांनी वेळीच स्थिती न सावरल्यास इथून पुढे संयमांचे आणखी स्फोट होतील.

विचार

# जैन मुनींचेही राजकारण्यांना आव्हान

*इतर क्षेत्रांप्रमाणेच शिक्षणक्षेत्रातही माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून एक प्रकारची क्रांती अनुभवायला मिळत आहे. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवादमाध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत.*





डॉ. सुकृत खांडेकर

जैन धर्माचे अनुयायी देशभर पसरले आहेत. राजस्थान, गुजरात आणि अन्य प्रांतांमधूनही आमच्या धर्माचे लोक शांततेने जीवन जगत आहेत. आमचा कोणाला त्रास नाही; मात्र कोणी आम्हाला, आमच्या धार्मिक प्रतिकांना धक्का लावायचा प्रयत्न केला तर आम्ही गप्प बसणार नाही. आमचा पक्ष देशभरात अस्तित्व दाखवेल. त्याची सुरुवात आम्ही येत्या निवडणुकीपासून करु, अशा आशयाचा इशारा अलिकडेच जैन मुनींनी दिला आणि एका नव्या वादाला सुरुवात झाली. अलिकडच्या काळात अनेक समाज रस्त्यावर उतरत राज्यकर्त्यांना धारेवर धरताना दिसतात. अनेक शहरांमधून, गावांमधून आपल्या अनुयायांना, विचार मानणाऱ्यांना एकत्र करत समाजबल आजम ावण्याचे इशारे दिले जातात. असे करताना ठराविक प्रांतीय, पंथीय किंवा विचार मानणाऱ्यांना एकत्र आणले जाते आणि त्यांच्या निशाण्यावर असतात सत्ताधारी. या सत्ताधाऱ्यांना इशारे देत अनेकांचे राजकारण आकाराला येते. त्यातल्या त्यात ही मंडळी आपले मनसुबे मान्य करुन घेण्याची धावपळ करताना दिसतात. बरेचदा सरकारही असे इशारे देणाऱ्यांना दाद देते आणि एखादा प्रकल्प, एखादी लक्षवेधी मागणी किंवा आरक्षणासारख्या अपेक्षेला चुचकारत संबंधितांना आशेला लावून ठेवतात. दिल्लीपासून गल्लीपर्यंत अनेक भागांम ध्ये हा प्रघात पहायला मिळतो. किंबहुना, अशा प्रकारे एकत्र येणाऱ्यांच्या वाढत्या संख्येमुळे अनेक संघटना, गट किंवा छोटे राजकीय पक्ष आकाराला येत आहेत. त्यातल्या त्यात निवडणुका जवळ असल्या की त्यांचे प्रमाण वाढल्याचे लक्षात येते.

सध्या बिहारमध्ये निवडणुकीचे रण पेटले आहे. तिथे तर जेमतेम दोन-चार मतदारसंघांमध्ये ताकद असलेले राजकारणी किंवा ठराविक जातींचे गटही एकत्र येत राजकीय ताकद आजमावताना दिसतात. आता जैन समाजाच्या अशाच धम कीवजा आवाहनाने देशातल्या एखाद्या मोठ्या राज्याइतकी ताकद असणाऱ्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत रंग भरले. वास्तविक पाहता, असे काही करण्याचा जैन समाजाचा मनसुबा नसावा, पण त्यांना ठराविक घडामोडींनी एकत्र यायला भाग पाडले आणि प्रकरण चिघळत गेल्यानंतर काहीशा अनपेक्षितपणे त्यांनी राजकीय पक्ष स्थापन करत सत्ताधाऱ्यांना निवडणुकीमध्ये नुकसान पोहोचवण्याचा इशारा दिला. त्यामुळे सर्वत्र नव्याने चर्चेत आली ती मुंबई महापालिकेची निवडणूक. सर्व पुर्वोत्तर राज्यांच्या एकत्रित आर्थिक ताकदीपेक्षा मोठी ताकद राखून असलेली मुंबई महापालिका राजकीय पक्षांसाठी ऑक्सिजनचे काम करते. शिवसेना, मनसे आणि अशा अनेक पक्षांसाठी तर या पालिकेच्या सत्तेत मिळणारा वाटा किंवा दाखवून देता येणारी ताकद अत्यंत महत्वाची ठरते. अलिकडेच याची नव्याने प्रचिती आली ती जैनधर्मियांच्या नाराजीमुळे आणि त्यांनी केलेल्या राजकीय पक्षाच्या घोषणेने. अलिकडेच मुंबई महापालिकेने मुंबईतून सार्वजनिक ठिकाणाहून एक्कावन्न कबुतरखाने हटवले. आरोग्याच्या दृष्टीने हे पाऊल उचलले असले तरी हे बहुसंख्य जैन समाजाला मान्य झाले नाही. कबुतरखान्यांच्या मुद्यावरून काही जैन मुनी तर आक्रमक झाले आहेत.

राजकीय पक्षांनी कबुतरखान्यांवरून केलेले राजकारण जैन मुनींना मुळीच पसंत पडले नाही. म्हणूनच मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आपला आवाज उठवण्यासाठी काही जैन मुनींनी पुढाकार घेऊन आपला 'शांतीदूत जनकल्याण पक्ष' मैदानात उतरवण्याचा मनसुबा बोलून दाखवला आहे. या नवीन पक्षाची घोषणा झाली असून त्याचा परिणाम कोणत्या राजकीय पक्षांना भोगावा लागणार या चर्चेला उधाण आले आहे. मुंबई महापालिकेचे या वर्षीचे बजेट ७२ हजार कोटींचे आहे, पुढील वर्षीचे ९० हजार कोटी होण्याची शक्यता आहे. म्हणूनच भाजपा, शिवसेना ( शिंदे ), उबाठा सेना ( उद्धव ठाकरे) हे तीनही पक्ष येत्या निवडणुकीत महापालिकेची सत्ता काबीज करण्यासाठी जोरदार तयारी करत आहेत. मुंबईतील धनवान मतदार असलेल्या जैन समाजाला दुखावणे कोणत्याच राजकीय पक्षाला परवडणारे नाही. पण मुंबईतील कबुतरखाने हटवण्याच्या कारवाईमुळे जैन समाज दुखवला गेला आहे. म्हणूनच कबुतरप्रेमी जैन मुनींनी नव्या पक्षाच्या स्थापनेची घोषणा केली आणि कबुतरखान्यावरून जैन समाजाला दुखवणाऱ्या नेत्यांना आवरा, असे आवाहन केले. जैन मुनी नीलेशचंद्र यांनी 'शांतीदूत जनकल्याण पार्टी' या नव्या पक्षाची स्थापना केल्याची घोषणा केली.

आपण मुंबई महापालिका निवडणूक लढवणार असल्याचे जैन मुनींनी जाहीर केले. काहीजण कबुतरखान्यांच्या मुद्यावरून राजकारण करत आहेत, मराठी लोकांचा कबुतरखान्याला विरोध नाही, असेही त्यांचे म्हणणे आहे. जैन धर्मिय सर्वाधिक टॅक्स भरतात, याचीही त्यांनी आठवण करून दिले. नव्या पक्षाचे चिन्ह कबुतर असेल आणि ही केवळ जैन धर्मियांची पार्टी नसेल तर सर्वांना त्यात प्रवेश असेल, असेही स्पष्ट करण्यात आले. कबुतरखान्यांना विरोध असणाऱ्यांना आपला विरोध राहील, असे मुनी नीलेशचंद्र यानी स्पष्ट केले. कबुतराला दाणे टाकणे आपला धर्म आहे, अशीही त्यांनी पुस्ती जोडली आहे. जैन, मारवाडी, गुजराथी मतदार सर्वसाधारणपणे भाजपाला मतदान करतात. जर जैन मुनी नवा पक्ष स्थापन करून आपले उमेदवार स्वतंत्रपणे निवडणुकीत उतरवणार असतील कोणत्या पक्षाला धोका निर्माण होऊ शकतो, यावर राजकीय वर्तुळात चर्चा रंगली. पूर्वी एका पक्षाला कोंबडीमुळे त्रास सहन करावा लागला होता, एका पक्षाला तर दिल्लीत कांद्यामुळे सत्ता गमवावी लागली होती. शिवसेनाप्रमुखांनी आपल्या पक्षाच्या बॅनरवर डरकाळी फोडणारा वाघ आणला. तो आजही गर्जतो आहे. मुंबई महापालिकेवर तीस वर्षे ठाकरेंच्या शिवसेनेची सत्ता होती. मुंबई महापालिकेची सत्ता हा उध्दव ठाकरे यांच्या पक्षाचा प्राणवायु आहे असे म्हटले जाते. उध्दव यांनी राज ठाकरेंच्या मदतीने मुंबई महापालिका जिंकण्याची जिद्द बाळगली आहे, तर दुसरीकडे मुंबईवर भाजपाचा महापौर बसवण्यासाठी पक्षाने सर्वस्व पणाला लावले आहे. एकनाथ शिंदे हे महापालिका निवडणुकीत किंग मेकरच्या भूमिकेत वावरत आहेत.

जैन मुनी नीलेशचंद्र यांनी म्हटले आहे की, जैन समाजाचे प्रतिक शांतीदूत कबुतर आहे. या शांतीदुताला विरोध करणाऱ्यांना आमचा विरोध राहील. या नव्या पक्षाला जैन, मारवाडी, गुजराती समाजाचा पाठिंबा मिळाला तर महायुतीचे, विशेषत: भाजपाचे मोठे नुकसान होऊ शकते असे राजकीय विश्लेषकांना वाटते. एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपा स्वबळावर लढण्याची तयारी करत आहे, पण शांतीदूत जनकल्याण पार्टीच्या घोषणेमुळे भाजपाला आता आपल्या रणनितीचा फेरविचार करावा लागणार आहेत. राज्यातील प्रत्येक लहान मोठ्या शहरात जैन, मारवाडी, गुजराती समाज आहे. हा मतदार एकगठ्ठा मतदान करतो. या समाजाची मते आपल्या हातून निसटू नयेत म्हणून सर्वच राजकीय पक्षांना दक्षता घ्यावी लागणार आहे. आरोग्याला घातक असल्यामुळे सार्वजनिक ठिकाणावरून मुंबईतील कबुतरखाने हटवण्याची कारवाई महापालिकेने सुरू केली तेव्हा जैन समाजाने मोठा विरोध केला. दादर आणि अन्य भागातील कबुतरखान्यांसमोर समाजाने शक्तिप्रदर्शन केले. त्यात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. सत्ताधाऱ्यांना साधुसंतांनी राजसत्तेत बसवले आहे; त्यामुळे धर्मसत्ता ही राजसत्तेपेक्षा वरचढ आहे, असे खडे बोल जैन मुनींनी सरकारमधील राजकीय पक्षांना सुनावले आहेत. जैन समाजाने ठाण्यात एकनाथ शिंदे यांन साथ दिली, आनंद दिघे यांच्या पाठिशीही जैन समाज उभा राहिला होता, मग आज शिंदेंचे काही नेते कबुतरखान्यावरून वाद निर्माण करत आहेत, त्यांना आवर घालावा असे आवाहन जैन मुनींनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केले आहे.

महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जैन समाजाने दोन कोटीचा धनादेश दिला असल्याचीही मुनींनी आठवण करून दिली. आता अशा या आर्थिकदृष्ट्या ताकदवान धर्मियांचे राजकीय आव्हान नेमके कोणाला त्रास देते, हे पहायचे.

# पवईतील घटनेने पालकांमधील चिंता वाढली

वैष्णवी वाडकर

मुंबईच्या पवई परिसरात नुकतीच एक धक्कादायक घटना घडली. या घटनेने संपूर्ण राज्याला हादरवून गेली आहे. ऑडिशनच्या नावाखाली तब्बल १७ लहान मुलं आणि काही ज्येष्ठ नागरिकांना ओलीस ठेवण्यात आल्याचं समोर आलं आहे. या घटनेनंतर पालकांच्या मनात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. पोलिसांनी धडक कारवाई करत सर्वांना सुरक्षित बाहेर काढलं. मात्र, या घटनेनंतर आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत आपण खरंच सजग आहोत का? असा प्रश्न पालकवर्गातून उपस्थित होत आहे. त्याचबरोबर या घटनेने पालकांमध्ये चिंता वाढल्याचे दिसून आले.

सिनेसृष्टीचा झगमगाट सगळ्यांनाच हवाहवासा वाटतो. विशेषतः तरुणाई आणि लहान मुलांचं स्वप्न असतं की, आपण अभिनेता किंवा अभिनेत्री व्हावं. अनेक मुलांना बालपणापासूनच नाचण्याची, गाण्याची आणि अभिनयाची आवड असते. पुढे जाऊन ही आवड कलेत रूपांतरित होते आणि काहींच करिअरही घडत. नेहमी म्हटलं जातं, शिक्षणाबरोबरच मुलांनी एखादी कला जोपासावी. एखादं वाद्य षिकाव, गाण, नृत्य किंवा चित्रकला शिकावी. या कलागुणांमधून त्यांचा आत्मविश्वास वाढतो. आजच्या काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून कला सादर करण्याची संधी सहज मिळते. अनेक लहान मुलांना आपण सोशल मीडियावरून टीव्ही कार्यक्रमांमध्ये किंवा चित्रपटांमध्ये झळकताना पाहतो. मात्र, या संधींच्या मागे काही वेळा धोका दडलेला असतो आणि पवईतील अलिकडची घटना त्याच जिवंत उदाहरण आहे.

या चमकत्या दुनियेत संधीच्या नावाखाली फसवणुकीचे प्रमाणही वाढले आहे. आपण अनेक अभिनेत्यांना मुलाखती देताना ऑडिशनच्या नावाखाली त्यांची फसवणूक झाल्याचा घटना ऐकल्या आहेत. अनेकदा ऑडिशनसाठी बोलवून पैषांची मागणी केली जाते. त्याचबरोबर महिलांच्या बाबतीत ऑडिशन घेताना त्यांचा गैरफायदा घेतल्याचा घटनादेखील घडल्या आहेत. पवईतील ऑडिशन प्रकरण हे त्याचं जिवंत उदाहरण आहे. प्रत्येक पालक आपल्या मुलाला पुढे न्यायचं स्वप्न पाहतो. मात्र, त्या स्वप्नांचा गैरफायदा घेणाऱ्यांचीही कमी नाही. मुलांना ऑडिशनसाठी बोलावलं जातं, मोठ्या जाहिराती दाखवून खोट्या आश्वासनांचं आमिष दिलं जातं आणि पालक व मुले त्यात नकळत ओढले जातात.

पवईतील आरए स्टुडिओतही असंच झालं. रोहित आर्य याने ऑडिशनच्या नावाखाली लहान मुलांना आत बोलावलं आणि सर्वांना बंद केलं. काही तास सुरू असलेल्या या नाट्याने संपूर्ण षहर हादरलं. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत सर्वांना सुरक्षित बाहेर काढलं, परंतु या घटनेने पालक आणि समाज दोघांनाही अस्वस्थ केलं. ही घटना घडण्यामागे विविध राजकीय कारणे जोडलेली आहेत. त्याचबरोबर या घटनेतील रोहित आर्य हा मानसिक रुग्ण असल्याचेदेखील बोलले जात आहे. मात्र, कोणतीही कारणे असली तरी मुलांना स्टुडिओत ओलीस ठेवणे चुकीचे होते, अशी प्रतिक्रिया सामान्य माणसांतून उमटत आहे. त्याचबरोबर रोहित आर्यने असे पाऊल उचलण्यामागे संबंधित प्रशासन देखील जबाबदार आहे, असे बोलले जाते.

आजच्या काळात सोषल मीडियावर किंवा मेसेजिंग ॲप्सवर कुणीही स्वतःला 'कास्टिंग डायरेक्टर', 'टॅलेंट हेड' किंवा 'ऑडिशन मॅनेजर' म्हणून ओळख देतो आणि अभिनयाची आवडत असलेल्यांशी मेसेज किवा कॉलद्वारे संपर्क साधतात. लोक त्यावर विश्वास ठेवतात आणि मुलांना तिथं घेऊन जातात. परंतु, त्या मागचं सत्य पडताळणं अत्यावश्यक आहे. प्रशासनाने अशा संस्थांवर काटेकोर नियम लावावेत, त्यांची परवानगी आणि पार्श्वभूमी तपासली जावी, अन्यथा अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू षकतात.

यासोबतच, या प्रकरणाने मानसिक आरोग्याचा मुद्दाही पुढे आणला आहे. आरोपी मानसिकदृष्ट्या अस्थिर असल्याचं सांगितलं जातं, परंतु प्रश्न असा आहे की, अशा व्यक्ती समाजात निर्भयपणे फिरतात कसे? त्यांना वेळेवर मदत आणि उपचार का मिळत नाहीत? मानसिक आरोग्य हा अजूनही समाजात दुर्लक्षित विषय आहे आणि त्याचे दुष्परिणाम अशा स्वरूपात समोर येतात. पवईतील घटना ही अगदी एखाद्या सिनेमातील थरारक दृश्यासारखी आहे. ही घटना फक्त एका शहरापुरती मर्यादित नाही. ती प्रत्येक पालक, शिक्षक आणि प्रशासनाला जागवणारी आहे. मुलांना त्यांच्या सुरक्षिततेबद्दल शिकवणं, 'नाही' म्हणायला शिकवणं, आणि कुठल्याही आमिषावर सहज विश्वास ठेवू नये, हे शिकवणं आता काळाची गरज आहे. पवई घटनेने एक गोष्ट स्पष्ट केली की, स्वप्नांच्या दुनियेत पाऊल टाकणं सुंदर आहे, परंतु सावध राहणं त्याहूनही महत्त्वाचं आहे. चमकत्या प्रकाशामागे अंधारही असतो आणि त्या अंधारात मुलं हरवू नयेत, ही जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे.

लोकसंसद

## सांग,सांग भोलानाथ पाऊस कधी थांबेल



अनेक हवामान अंदाजाना फोल ठरवत गेली सहा सात महिने झाले पावसाने हाहाकार उडवून दिला आहे. भारतीय इतिहासात कधी नव्हे तो इतका पाऊस बरसत असल्याने कोणालाच काही समजेना. यंदाच्या पावसाने सर्वच रेकॉर्ड मोडत एक नवा इतिहास निर्माण केला आहे पण या सर्व बदलांना मानवचं जबाबदार आहे असे ठणकावून सांगितले तरी ते खोटे ठरु नये. देशांमध्ये विविध योजना अर्थात पुल, रस्ते, मोठंमोठे प्रकल्प, उद्योगधंदे यासारखी विकासात्मक कामे करताना निसर्गाला मोठ्या प्रमाणात धक्का पोहचत असल्याचे दिसून येते आहे. तसेच युद्धजन्य परिस्थिती यामुळे उष्मा वाढत आहे. समुद्रामध्ये सातत्याने निर्माण होणारी वादळे यामुळे पाऊस पडण्यास मदत होत असल्याचे बोलले जात आहे. निसर्गाने आपणाला भरभरुन मौल्यवान निसर्गसंपदा दिल्या आहेत त्यांना आपण धक्का न लावता विकास आराखडा तयार केला पाहिजे. आधुनिक जगात वावरत असताना मानवाने अनेक क्षेत्रांत झपाट्याने उल्लेखनीय प्रगती साधली असली तरी निसर्गाच्या विरोधात जावून चालणारं नाहि निसर्गाच्या पुढे आपण धावत असल्याने निसर्ग आपला डाव साधत आहे अनियमित अतिवृष्टी, ढगफुटीसारखा पाऊस तर कधी कडक ऊन, भूकंप, पूरस्थिती वातावरणातील फेर पलटं यासारख्या निसर्गाच्या प्रकोपामुळे मानवाचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे यंदाच्या पावसाने महाराष्ट्रातील विविध भागातील हातातोंडाशी आलेली पिके नष्ट झाली आहेत अनेक ठिकाणी जिवीत व वित्तहानी झाली आहे त्यामुळे सरकार आणि मानवाने या निसर्गाच्या इशाऱ्याकडे वेळीच गांभीर्याने लक्ष देवून उपाय योजना निर्माण केल्या पाहिजेत तरचं निसर्गाचा आनंद लुटता येईल! **– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# भगवान विष्णूने तुळशीशी लग्न का केले?

कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील देवउठनी एकादशीच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच द्वादशी तिथीला तुळशी विवाह संपन्न होतो. या विशेष प्रसंगी तुळशी माता आणि भगवान विष्णूचे स्वरूप असलेल्या शालिग्राम यांचा विवाह सोहळा पार पडतो. तुळशी विवाहाच्या दिवसापासूनच लग्नासारख्या मंगल कार्यांना सुरुवात होते. अशी श्रद्धा आहे की, तुळशी विवाह केल्याने खूप पुण्य मिळते आणि व्यक्तीच्या जीवनातील सर्व दु:ख नाहीसे होतात. तुळशी विवाह हा आपल्या संस्कृतीतील एक अत्यंत पवित्र आणि श्रद्धेने साजरा होणारा सण आहे. यानंतरच खऱ्या अर्थाने विवाहसोहळ्यांचा हंगाम सुरू होतो, असे मानले जाते. या दिवशी तुळशी आणि विष्णूंचा शालिग्रामाशी विवाह लावला जातो. घराघरात मंगलगीतं, आरत्या आणि सुगंधी फुलांनी सजलेली तुळशी वृंदावनं दिसतात. हा दिवस केवळ धार्मिक विधींनी मर्यादित नसून तो प्रेम, निष्ठा आणि नात्यांच्या पवित्रतेचं प्रतीक मानला जातो. असंही म्हणतात की, तुळशी विवाह म्हणजेच देवतांचा विवाहसोहळा. त्यामुळे या दिवशी तुळशीला वधू आणि शालिग्राम ाला वर मानून विवाहविधी पार पाडला जातो. या विधीमुळे घरात समृद्धी, आनंद आणि शांती नांदते, असा समज आहे. अनेक ठिकाणी स्त्रिया या दिवशी सवाष्णपणाने सजतात आणि तुळशीच्या मांडवाखाली सगळ्या कुटुंबासह पूजा करतात. तुळशीचं पान हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानलं जातं आणि तिच्याशिवाय कोणतीही पूजा पूर्ण होत नाही, ही श्रद्धा आजही टिकून आहे. हा दिवस आपल्या संस्कृतीतील नात्यांच्या पवित्रतेची आठवण करून देतो. जिथे केवळ देवदेवतांचाच नव्हे तर मानवी जीवनातील संबंधांचाही सन्मान केला जातो. तुळशी विवाह म्हणजे केवळ धार्मिक परंपरा नव्हे, तर जीवनात प्रेम, श्रद्धा आणि सातत्य जपण्याचं प्रतीक आहे. तुळशी विवाह कथा-पौराणिक मान्यतेनुसार, जालंदर नावाचा एक राक्षस होता. त्याने आपल्या पराक्रमाने वैभव, यश प्राप्त केले होते. मात्र, तो सतत देवी-देवता, ऋषीमुनींना त्रास द्यायचा. त्याच्या त्रासाला देवलोक त्रासले होते. पण जालंदरचा पराभव करणं देवांना जमत नव्हते. यामागचे कारण म्हणजे जालंदरची पत्नी वृंदा ही खूप पुण्यवान होती. तिच्या पुण्याईमुळे जालंदरला वैभव, यश प्राप्त झाले होते. राक्षसांच्या कुळात जन्मलेल्या वृंदाने लहानपणापासूनच भगवान विष्णूची पूजा केली, ती मोठी झाल्यावर तिचा विवाह जालंधर नावाच्या राक्षसाशी झाला. वृंदाच्या भक्ती, तपश्चर्या आणि देशभक्तीमुळे जालंधरला आणखी शक्ती प्राप्त झाली. आपल्या अफाट शक्तीचा वापर करून त्याने देव, मानव आणि दानवांचा छळ सुरू केला. जालंधरच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या देवतांनी या समस्येवर उपाय शोधण्यासाठी भगवान विष्णूंचा आश्रय घेतला. जालंधरपासून देवांना वाचवण्यासाठी भगवान विष्णू स्वतः जालंधरचे रूप घेऊन वृंदाकडे गेले. जालंधर बनून त्याने वृंदाची देशभक्ती नष्ट केली, त्यामुळे जालंधरची शक्ती कमी झाली आणि त्याचा वध झाला. भगवान विष्णूच्या या कपटाची जाणीव झाल्यावर वृंदाने त्याला दगड बनण्याचा शाप दिला. यानंतर सर्व देवी-देवतांनी हा शाप परत घेण्यासाठी वृंदाकडे प्रार्थना केली. देवदेवतांची विनंती मान्य करून वृंदाने आपला शाप परत घेतला पण त्यानंतर वृंदाने देहत्याग केला. भगवान श्री विष्णूंनी वृंदेच्या पतिव्रतेमुळे संतुष्ट होऊन तिला तुळशीचे रोप होण्याचा वर दिला. त्यानंतर वृंदाहीच तुळशीच्या रूपाने प्रकट झाली. वृंदेचे महत्त्व वाढावे म्हणून भगवान विष्णूंनी तुळशीसोबत लग्न केले. त्यादिवशीपासून आपल्याकडे तुळशी विवाह करण्याची परंपरा सुरू झाली. तुळशी विवाहाचे महत्त्व-हिंदू धर्मात तुळशीला खूप महत्त्व दिले गेले आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**३ नोव्हेंबर**

१) श्री. यशवंत गोविंद बोडस अलिबाग, ३-११-१९४१

२) श्रीम. प्रतिभा प्रभाकर वडके पिंपळभाट, अलिबाग ३-११-१९४१

३) श्री. नारायण गजानन बापट अलिबाग, ३-११-१९५५

## भीषण अपघातात दोघे ठार

**पुणे :** पुणे शहरात पुन्हा एकदा भरधाव वेगामुळे भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. पुणे शहरातील बंड गार्डन मेट्रो स्टेशनजवळ रविवारी (दि. २) पहाटेच्या सुमारास एका भरधाव कारने मेट्रोच्या खांबाला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, यात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी झाला आहे. अतिशय वेगात असलेली ही कार रस्त्यावरील डिव्हायडरला धडकून अनियंत्रित झाली आणि थेट मेट्रोच्या खांबावर जाऊन आदळली. धडक इतकी जोरदार होती की, कारचा चक्काचूर झाला. या अपघातात ऋतिक भंडारे आणि यश भंडारे या दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

# किनेश्वर धरणाच्या जमिनी खरेदीत सेवानिवृत्तांचे कनेक्शन?

## • ६९ शेतकऱ्यांच्या जमीन खरेदीचा व्यवहार; मात्र, ७/१२ अजूनही शेतकऱ्यांचाच!

**। पोलादपूर । शैलेश पालकर ।**

तालुक्यातील अनेक ठिकाणी धरणांच्या कामांचा शुभारंभ २०१५-१८ दरम्यान नारळ फोडून करण्यात आल्यानंतर पैठणवगळता कोणत्याही धरणाच्या भूसंपादनाचा मोबदला स्थानिक शेतकऱ्यांना मिळाला नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. चार-पाच वर्षांपूर्वीच ६९ शेतकऱ्यांच्या जमीन खरेदीचा व्यवहार होऊनही शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील नांवे अद्याप कायम असल्याने ऐनवेळी सातबारा उताऱ्यावरील नावे बदलून शेतकऱ्यांऐवजी स्वत:लाच भूसंपादनाचा मोबदला जमिनी खरेदी करणाऱ्या व्यक्तीस मिळवायचा आहे अथवा कसे, असे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




पोलादपूर तालुक्यातील किनेश्वर धरणाच्या कामासाठी आवश्यक जमिनीवर पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्त्यापासून काही मीटर अंतरावरील पायटे गावाच्या दरीमध्ये जमिनीचे सपाटीकरण, कातळातून डबर उत्खनन तसेच मातीचा भराव करून डबरीचे पिचिंग काम करण्यासाठी जमिनीचा वापर करण्यात आला आणि याच जमिनीवर नियोजित धरणप्रकल्प उभारण्यात येणार असल्याचे निश्चित झाल्याने शेतकऱ्यांची अनुकूलता मिळविण्याकामी सेवानिवृत्त महसुली अधिकाऱ्याने ठेकेदारांना जमिनीचा वापर करण्यापूर्वी शेतकऱ्यांना थोडाफार मोबदला देण्याची अपेक्षा व्यक्त करून ठेकेदारानेही त्यास मान्यता दिल्याची चर्चा चार वर्षांपूर्वी या परिसरात झाली. यामुळे सेवानिवृत्त सरकारी अधिकाऱ्यामुळे भूसंपादित जमिनीच्या शेतकऱ्यांना तुटपुंजा का होईना थोडा तरी मोबदला खासगीरित्या मिळाल्याचे समाधान होते. मात्र, पुढे हे धरणाचे काम रखडले आणि या धरणामुळे किनेश्वर, आड, कापडे खुर्द, कापडे बुद्रुक येथील शेतीच्या पाण्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल ही अपेक्षा फोल ठरली.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणावेळी झालेल्या भूसंपादनामध्ये पोलादपूर तालुक्यात महसुली कर्मचारी अधिकारी तसेच महाड उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी यांचासहभागभूसंपादनमोबदल्यातील गुंजभर मिळविण्यासाठी उपयुक्त ठरत होता. किनेश्वर धरणाच्या भूसंपादनापेक्षा जमीन विक्रीमध्ये हेच कनेक्शन उघड होत आहे.

कापडे खुर्द आणि किनेश्वर येथील ६९ शेतकऱ्यांच्या एकूण १३ सर्व्हेनंबर हिस्सा नंबर असलेल्या जमीन खरेदीचा व्यवहार चार-पाच वर्षांपूर्वीच झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मात्र, ७/१२ अजूनही शेतकऱ्यांच्या नावेच असून, खरेदी करणाऱ्या व्यक्तीने पोलादपूर तालुक्यात वाचकांना मिळत नसलेल्या एका अनभिज्ञ वृत्तपत्रामध्ये जमिनींची खरेदी करणार असल्याची नोटीस प्रसिध्द केली असल्याचे दाखवून आगामी काळात राजकीय तसेच प्रशासकीय व्यक्तींसमोर टक्केवारीचे वजन वापरून भूसंपादनाचा मोबदला वाटून खाण्याचा विचारही कृतीत आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे समजून येत आहे.

याच भागातील जमिनींची मुंबई, ठाणे परिसरातील काही लोकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करून त्या जमिनींच्या सातबारा उताऱ्यांवर काही बँका, पतपेढ्या तसेच फायनान्स कंपन्यांचे २ कोटींहून अधिक रकमेचा बोजा चढविण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. महाबळेश्वर रस्त्यालगतच्या ग्रीन व्हॅलीसारख्या किनेश्वर गाव व किनेश्वर वाडीला प्राईम लोकेशनचा दर्जा अनेक जमिनमाफियांनी गुगल अर्थवरील आपापल्या जमिनींच्या नकाशांना दिला असून, शेतकऱ्यांकडून अत्यल्प मोबदल्याने खरेदी केलेल्या या जमिनींना पुनर्विक्री व्यवहारात कोटयवधी रूपयांचा मोबदला देणाऱ्या जमिनी म्हणून गुंतवणूकदार तसेच हरित लवादांकडून कार्बनक्रेडीटची सक्ती झालेल्या प्रदूषणकारी कारखानदारीला आकर्षित करण्यास सुरूवात केली आहे.

किनेश्वर गावातील काही जमिनींवर सोलापूर, सांगली व पश्चिम महाराष्ट्रातील काही पतपेढयांनीही संबंधित साताबारा उताराधारकांनी घेतलेल्या कर्जाचा कोट्यवधीचा बोजा चढविण्यासाठी स्थानिक सजांमध्ये धाव घेतली. यावेळी या जमिनींची एवढी मोठी रक्कम कर्जाऊ देण्याचा रेडीरेक्नर नसल्याचे पाहून फसवणूक झाल्याचे गृहित धरूनसुध्दा बोजा चढविल्याची माहिती प्राप्त झाली आहे. किनेश्वर धरण परिसरातील जमिनींची भूसंपादनाचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना जाहीर होईपर्यंत त्यांच्याच नावे सातबारा ठेवण्याचा प्रकार झाला असल्यास शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला कोणाला दिला जाणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. एकीकडे, किनेश्वर धरण रखडल्यानंतर दुसरीकडे शेतकऱ्यांचा भूसंपादनाचाही मोबदला हडपला गेल्यास शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे. पोलादपूर तालुक्यातील अन्य नियोजित धरण प्रकल्पांमध्ये अद्याप शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला न मिळताच धरणाचे काम सुरू करून अर्धेअधिक पूर्ण झाले आहे तर देवळे धरणासाठी १९८६ साली वसंत बंधारा बांधण्यासाठी अत्यल्प मोबदला वाटप केल्यानंतर त्याच ठिकाणी त्यानंतर तीनवेळा आधीचा बंधारा पाडून नव्याने बंधारा बांधण्याकामी २०० कोटींहून अधिक खर्च होऊन शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला दिला गेला नाही.

सद्य:स्थितीत पोलादपूर तालुक्यात कोंढवी, बोरघर, कोतवाल, किनेश्वरवाडी, चांभारगणी, तुर्भे खोंडा, पैठण-परसुले, लघुपाटबंधारे धरण प्रकल्पांचे काम रखडले असून देवळे धरण मुळापासून उखडून नव्याने बांधण्याचे कामही लांबलेल्या पावसामुळे रखडले असल्याचे दिसून येत आहे. पैठण-परसुले धरण वगळता या सर्व नियोजित धरणांच्या जमिनींच्या शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळाला नसताना त्यांच्या जमिनीवरील झाडे, माती, दगडी तसेच अन्य नैसर्गिक संपदा संबंधित ठेकेदारांकडून धरणांच्या कामामुळे उदध्वस्त करूनही मोबदल्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन आग्रही नसल्याने राजानेच मारले तर कोणाकडे दाद मागायची, असा प्रश्न कपाळाला हात लावून नशिबाला दोष देणाऱ्या शेतकऱ्यांना सतावित आहे.

## राष्ट्रवादीतून सांगळे, चारोस्करांची हकालपट्टी

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे काऊंटडाऊन सुरू झाले असून, दुसरीकडे राजकीय पक्षांनी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. काही पक्षांमध्ये इनकमिंग-आउटगोईंग सुरू झाले आहे. काही महत्त्वाच्या महापालिकांसाठी राजकीय पक्ष आणि बड्या नेत्यांनी कंबर कसली असताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने नाशिकमध्ये विधानसभा निवडणुकीत पक्षाचे उमेदवार राहिलेले उदय सांगळे आणि सुनिता चारोस्कर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील या दोन्ही नेत्यांवर पक्षविरोधी भूमिका आणि दलबदलू वृत्तीचा ठपका ठेवण्यात आला आहे. सिन्नर विधानसभा मतदारसंघातून उदय सांगळे, तर दिंडोरी विधानसभा मतदारसंघातून सुनिता चारोस्कर यांनी मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. मात्र, अलिकडे दोघांनीही पक्षाविरोधी कार्य केले तसेच स्वार्थी आणि दलबदलू मानसिकतेची भूमिका घेतल्याचा आरोप पक्षाने केला आहे.

## मुंबईत घरांच्या विक्रीत घट
### गेल्या वर्षीपेक्षा मागणी १४ टक्क्यांनी कमी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आपलं छोटसं का असेना, पण घर असावं अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. बड्या शहरात घराच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यात इतर कर, महागाई याचा ताळमेळ बसत नसल्यांनी ग्राहकांनी घर खरेदीची योजना पुढे ढकलल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. यंदा ऑक्टोबर महिन्यात मुंबईमध्ये ११ हजार २०० मालमत्तांची विक्री झाली असून, गेल्या वर्षी याच महिन्याच्या तुलनेत विक्रीच्या या प्रमाणात १४ टक्क्यांची घट नोंदवली गेली.



एकीकडे मालमत्ता विक्रीमध्ये घट झालेली असताना याचा परिणाम मुद्रांक शुल्काच्या रूपाने मिळणाऱ्या महसुलातही घट होण्याच्या रूपाने दिसून आला.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये १३ हजार २०० मालमत्तांची विक्री झाली होती. त्याद्वारे राज्य सरकारला १२०५ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता. यंदाच्या वर्षी महसुलात १७ टक्क्यांची घट होत १००४ कोटी रुपयांचा महसूल मिळाला. यंदा ऑक्टोबरमध्ये दिवाळी होती. वास्तविक, या सणामध्ये गृहविक्रीला चालना मिळणे अपेक्षित होते. पण सणासुदीतही घर खर्चासाठीचे बजेट जुळत नसल्याने ग्राहकांनी घर खरेदीकडे पाठ फिरवल्याचे दिसून येते.

केवळ गेल्या वर्षीच्याच नव्हे, तर गेल्या महिन्याच्या अर्थात सप्टेंबर २०२५ च्या महिन्याच्या तुलनेतदेखील ऑक्टोबर २०२५ या महिन्यात मालमत्ता विक्रीमध्ये ७ टक्क्यांची घट झाली.सप्टेंबर महिन्यात मुंबईत १२ हजार ७० मालमत्तांची विक्री झाली होती. मात्र, ज्या मालमत्तांची विक्री झाली आहे. त्यामध्ये ८० टक्के मालमत्ता या निवासी स्वरूपाच्या असून, २० टक्के मालमत्ता या कार्यालयीन, तसेच व्यावसायिक स्वरूपाच्या आहेत. चालू वर्षात मुंबईत जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीमध्ये आतापर्यंत एकूण १ लाख २३ हजार १४१ मालमत्तांची विक्री झाली आहे.

## निवडक

### उद्योजकाला चार कोटींचा गंडा

**ठाणे :** मोठ्या बांधकाम प्रकल्पात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करून प्रकल्प वर्षभरात पूर्ण न झाल्यास गुंतवणूक रक्कमेवर प्रतिवर्षाला १८ टक्के व्याज आणि बांधकाम प्रकल्पात झालेल्या नफ्यातून अतिरिक्त रक्कम देण्याचे आमिष दाखवून मुंबईतील उद्योजकाची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार ठाण्यात घडला आहे. मुंबईतील उद्योजकाला चार कोटींचा गंडा घातल्याचा गुन्हा ठाण्याच्या श्रीनगर पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. चार कोटींचा गंडा घालणारा संशयित आरोपी आणि तक्रारदार उद्योजक हे अनेक वर्षापासून परिचयाचे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, १४ जानेवारी २०१६ ते १४ जून २०२४ दरम्यान फसवणूक करणारा संशयित आरोपी याने तक्रारदाराच्या ठाण्यातील मुलुंड चेकनाका येथे ऑफीसला जाऊन त्यांना त्यांच्या कन्स्ट्रक्शन कंपनीत ठाणे आणि मुंबई येथील प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले. यावेळी संशयित आरोपीनं तक्रारदारांना बांधकामात होणाऱ्या फायद्याची रक्कम देतो तसेच प्रकल्प वर्षभरात पूर्ण न झाल्यास गुंतवणूक रक्कमेवर प्रति वर्षी १८ टक्के व्याज देतो असे सांगितले. अशा प्रकारे ४ कोटींची गुंतवणूक झाल्यानंतर एका वर्षानंतर आरोपीने गुंतवणूकदारांना कुठल्याही प्रकारचा मोबदला दिला नाही. जमा केलेला पैसे हा स्वत:च्या फायद्यासाठी वापरून गुंतवणूकदार उद्योजकाची फसवणूक केली. या प्रकरणी ठाण्याच्या श्रीनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.या फसवणुकीच्या प्रकारासोबत आरोपीने आणखी काही व्यावसायिकांची फसवणूक केली असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यामुळे पोलीस उपआयुक्त प्रशांत कदम यांनी अशी फसवणूक झाली असल्यास ठाणे पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

### विवाहित प्रियकराचा प्रेयसीवर चॉपरने हल्ला

**पुणे :** प्रेम आणि संशय यांच्या नाजूक धाग्यात गुंफलेल्या एका लव्ह स्टोरीचा हिंजवडी परिसरात अत्यंत रक्तरंजित शेवट झाला. प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या संशयामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये एका प्रियकराने मित्रांच्या मदतीने १८ वर्षीय प्रेयसीवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हिंजवडी परिसरात असलेल्या या चॉपर हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही थरारक घटना हिंजवडी परिसरातील एका पेट्रोल पंपाजवळ साखरे वस्तीजवळ वर्दळीच्या ठिकाणी घडली. १८ वर्षीय तरुणी या ठिकाणी आली असता मुख्य आरोपी योगेश भालेराव आणि त्याचे साथीदार दबा धरून बसले होते. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता तरुणीवर हल्ला केला. यावेळी आरोपींनी तिच्या डोक्यावर, मानेवर आणि हातावर चॉपरसारख्या धारदार शस्त्राने सपासप वार केले. ज्यामुळे ती तिथेच रक्ताच्या थारोळ्यात कोसळली.

या हल्ल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. यानंतर काही नागरिकांनी जखमी तरुणीला तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांच्या पथकाकडून तिच्यावर उपचार सुरु आहेत. तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोललं जात आहे.




### यंदा शिष्यवृत्तीच्या दोन परीक्षा!

**मुंबई :** शासन निर्णयानुसार सध्या पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा व्हायची. पण, आता नव्या शासन निर्णयानुसार पूर्वीप्रमाणे चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. पण, अचानक शासन निर्णयात बदल केल्याने यावर्षी चौथी-पाचवी आणि सातवी-आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा होईल. त्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क जिल्हा परिषदेच्या सेसमधून भरण्याचा निर्णय झाला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सुरवातीपासून इयत्ता चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जात होती. पण, काही वर्षांपूर्वी त्यात बदल करून शिष्यवृत्तीची परीक्षा इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केली. आता पुन्हा त्यात बदल करण्यात आला. नव्या बदलानुसार आता पुन्हा चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. पण, हा बदल शैक्षणिक वर्षाच्या मध्यावधीत झाल्याने पूर्वीच्या शासन निर्णयानुसार यंदा पाचवी व आठवीच्या आणि चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांचीदेखील परीक्षा होणार आहे. त्यामुळे विद्यार्थी संख्या वाढणार असल्याने प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेस इच्छुक चौथी व सातवीतील विद्यार्थ्यांची संख्या मागविली आहे.

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठ्ठलाची सपत्नीक पूजा

**। पंढरपूर । प्रतिनिधी ।**

कार्तिकी एकादशीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक पंढरपूर येथे विठ्ठलाची शासकीय पूजा केली. नांदेडच्या वालेगावकर दाम्पत्याचा मानाच्या वारकऱ्यांमध्ये सन्मान झाला; ते २० वर्षांपासून वारी करत आहेत. मंदिर समितीने तुळशीची माळ घालून वालेगावकर दाम्पत्याचा सत्कार केला.



कार्तिकी एकादशीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक पहाटे पंढरपूर येथे विठ्ठलाची शासकीय पूजा संपन्न झाली. यावेळी नांदेडच्या हिमायतनगरमधील रामराव वालेगावकर आणि सुशिलाबाई वालेगावकर मानाचे वारकरी ठरले. मंदिर समितीच्या वतीने शिंदेंच्या हस्ते तुळशीची माळ घालून त्यांचा सत्कार करण्यात आला. वालेगावकर दाम्पत्य हे मागील २० वर्षांपासून वारी करत आहेत. शासकीय महापुजेच्या वेळी खासदार श्रीकांत शिंदे देखील सपत्नीक उपस्थित होते. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच मंत्री भरत गोगावलेदेखील यावेळी उपस्थित होते. शासकीय महापुजेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, वारकरी हे शेतकरीच आहेत. शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे, त्यांना दिलासा देण्याची गरज आहे. राज्य शासनाने ३२ हजार कोटींची मदत जाहीर केली आहे.तसेच जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्याचा निर्णय देखील घेतला आहे. बळीराजावरील सर्व संकटे दूर कर हेच मागणे मागण्यासाठी पांडुरंग चरणी आलो असल्याचेही एकनाथ शिंदे म्हणाले.

## नवी मुंबईत मंगळवारी पाणी बंद

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातील एमबीआरमध्ये नवीन पाइपलाइन टाकण्याचे काम येत्या मंगळवारी हाती घेण्यात येणार आहे. तसेच मुख्य पाइपलाइनवरील व्हॉल्वही बदलले जाणार आहेत. त्यासाठी नवी मुंबई शहराचा पाणीपुरवठा मंगळवारी सकाळी ९ पासून बुधवारी पहाटे ३ वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे.

नवी मुंबई शहराला खालापूर परिसरातील मोरबे धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मोरबे धरणातील पाणी भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातून नवी मुंबई शहरात येते. येत्या मंगळवारी ४ नोव्हेंबर रोजी या केंद्रातील एमबीआरमध्ये नवीन पाइपलाइन टाकण्यात येणार आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाइपलाइनवरील काही व्हॉल्व खराब झाले आहेत. हे व्हॉल्वही बदलण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

दुरुस्तीच्या कालावधीत बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली आणि ऐरोली विभागातील नळ कोरडे राहणार आहेत. बुधवारी सकाळी पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे. नागरिकांनी या कालावधीत पाण्याचा जपून वापर करावा, पाण्याची नासाडी करु नये, असे आवाहन शहर अभियंता विभागाने केले आहे.

## यंदा आंब्याचा हंगाम लांबणार

**। राजापूर । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवानंतर झालेल्या पावसामुळे आंब्याला आलेली पालवी कुजून त्याचा डिसेंबर-जानेवारी महिन्यामध्ये येणाऱ्या आंब्याच्या मोहोरावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती आंबा बागायतदारांकडून वर्तविली जात आहे. अवेळी पावसाचे आणखीन काही दिवस सातत्य राहिल्यास यावर्षीचा आंबा हंगाम नेहमीपेक्षा पंधरा दिवस लांबणीवर पडण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. असे घडल्यास त्याचा यावर्षीच्या आंबा हंगामाला आणि बागायतदारांच्या उत्पन्नाला फटका बसण्याची शक्यता आहे. नेहमीच्या तुलनेमध्ये पंधरा दिवस उशिरा लांबणीवर पडण्याची शक्यता बागायतदारांनी व्यक्त केली आहे.

## बिअरच्या बाटलीने बापलेकावर हल्ला

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाण्याच्या मेंटल हॉस्पिटलजवळ असलेल्या भुर्जीपावच्या गाडीवर सुरू असलेल्या भांडणात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या बाप-लेकावरच एका टोळक्याने बियरच्या बाटलीने हल्ला केल्याची घटना शनिवारी मध्यरात्री घडली. या घटनेत १७ वर्षीय युवक आणि त्याचे वडील असे दोघे पिता पुत्र जखमी झाले आहेत. याप्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात सात जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या घटनेतील तक्रारदार युवक सेवालाल नगर परिसरात राहात असून, तो बाहेरून दहावीची परीक्षा देत आहे. त्याची आई या त्याच परिसरात भुर्जीपावची हातगाडी लावते. तसेच तो आईला मदत करतो. शनिवारी रात्री १ वाजण्याच्या सुमारास तक्रारदार आणि त्याची आई गाडी बंद करताना, त्याचा मामा आणि मामाचा मित्र गप्पा मारत होते. त्यावेळी एका दुचाकीवरून तिघेजण तसेच दुसऱ्या दुचाकीवरून काहीजण आले. यावेळी त्यांनी मोटारसायकल गप्पा मारत असलेल्या मामा आणि त्याच्या मित्राच्या मधून आणली. त्यामुळे तक्रारदारांच्या मामाने त्यांना याबाबत विचारणा केली. याचा राग मनात धरून त्या सातजणांनी त्या दोघांना शिवीगाळ केली. यावेळी तक्रारदार युवक टोळक्यास समजावण्यासाठी गेल्यावर एकाने त्याच्या कानाखाली मारली. तसेच त्याच्या मित्राने बियरची बाटली तक्रारदारांच्या डोक्यात फोडली. त्यावेळी मध्ये पडलेल्या तक्रारदारांच्या आई वडिलांना लाथाबुक्क्यांनी देखील मारहाण केली. या घटनेप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वागळे इस्टेट पोलिसांकडून करण्यात येत आहेत.

## ७३० हून अधिक रस्त्यांची देखभाल करण्यासाठी पुढाकार | २४६ कनिष्ठ पर्यवेक्षकांवर जबाबदारी

# रस्त्यांच्या स्वच्छतेसाठी मुंबई मनपाचा ‘रस्ते दत्तक उपक्रम’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि उपनगरे) क्षेत्रातील रस्त्यांची नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्याच्या उद्देशाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ‘रस्ते दत्तक उपक्रम’ राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत मुंबईतील ७३० हून अधिक रस्त्यांची शाश्वत देखभाल आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी २४६ कनिष्ठ पर्यवेक्षकांवर प्रत्येकी किमान तीन प्रमुख रस्ते आणि मार्गांची दत्तकत्व जबाबदारी सोपविण्यात येणार आहे.



बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांच्या देखरेखीत बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि उपनगरे) क्षेत्रात स्वच्छतेच्या दृष्टीने विविध उपाययोजना केल्या जात आहेत तसेच विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरातील प्रमुख रस्ते आणि मार्गांची शाश्वत देखभाल आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी कनिष्ठ पर्यवेक्षकांच्या माध्यमातून रस्ते दत्तक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत, प्रत्येक कनिष्ठ पर्यवेक्षक नियमित स्वच्छता आणि देखभालीसाठी किमान तीन प्रमुख रस्ते किंवा मार्ग दत्तक घेतील. यामध्ये सुमारे ७३० हून अधिक रस्ते किंवा मार्ग समाविष्ट केले जातील. दत्तक घेतलेल्या प्रत्येक प्रमुख रस्त्यावर किंवा मार्गावर व्यापक स्वच्छता आणि परिपूर्ण देखभालीची कामे केली जातील. यामध्ये रस्त्याच्या पृष्ठभागाची संपूर्ण स्वच्छता करणे, रस्त्यावर पडलेले टाकाऊ पदार्थ, बांधकाम राडारोडा आदींचे निर्मूलन करण्यात येईल. दुभाजक, मध्यवर्ती भाग, पदपथ आणि सेवा रस्ते नियमितपणे स्वच्छ करणे, धुणे आणि त्यांची देखभाल करण्याची कामेही या अंतर्गत केली जातील. धुळीचे प्रमाण कमी करण्याकरिता रस्ते वेळोवेळी धुतले जातील आणि मिस्टिंग मशीन वापरून पाण्याने फवारणी केली जाईल. चौकातील व उड्डाणपुलांखालील भित्तीचित्रे इत्यादींची स्वच्छता केली जाईल.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले की, सार्वजनिक ठिकाणांची दीर्घकालीन देखभाल करण्यासाठी जबाबदारी सुनिश्चित करणे आणि प्रत्यक्ष क्षेत्रावर (ऑन फील्ड) कार्यरत असणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये सक्रिय सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आले आहे. नागरिकांचा सहभाग आणि सहकार्य यामुळे हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल. त्यामुळे, नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवून महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक प्रयत्नांना बळ द्यावे, असे आवाहनदेखील त्यांनी केले आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# महायुतीत आर्थिक निकषांवर उमेदवारी?

## ■ आगामी निवडणुकीसाठी जोरदार रस्सीखेच ■ विकासाचा मुद्दा राहिला बाजूला

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

**डिसेंबर–जानेवारीच्या दरम्यान जिल्हा परिषद, पंचायत समितीसह नगरपालिका निवडणुका होण्याचे संकेत मिळत असल्याने या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट व भाजप या प्रमुख पक्षांमध्ये महायुतीमध्ये असले तरी उमेदवारी मिळविण्यासाठी रस्सीखेच सुरू असल्याची चर्चा आहे. या प्रमुख पक्षांमध्ये आर्थिक निकषांवर उमेदवारी देण्याचे निकष लावण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. सध्या विकासाचा मुद्दा बाजूला ठेवून आर्थिक निकष पुढे आला असल्याने आगामी निवडणुका मोठ्या रंगतदार होणार यात शंका नाही.**



दरम्यान, इच्छुक उमेदवारांना आर्थिक बाजूची काय, तयारी आहे असे कार्यकर्त्यांच्या बैठकीत विचारणा होत असून, उमेदवार स्वता सक्षम असेल तरच उमेदवारी दिली जाईल असा फतवा प्रमुख राजकीय पक्षांनी काढला असल्याची जोरदार चर्चा कार्यकर्त्यांमध्ये दबक्या आवाजात सुरू आहे. तर शिवसेना शिंदे गटात खालापूरमध्ये कर्जत तालुक्यातील उमेदवारही तयारीत असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी आर्थिक जुळवाजुळव करण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, याआधी विकासाचा मुद्दा व दांडगा जनसंपर्क ठेवणाऱ्या कार्यकर्त्याला सहज उमेदवारी दिली जात होती.

खालापूर तालुक्यातील चार जिल्हा परिषद व आठ पंचायत समिती यासह खोपोली नगरपालिकेच्या निवडणुका होण्याचे संकेत मिळत आहेत. आरक्षण सोडतीनंतर निवडणूक लढविण्याची इच्छुक उमेदवारांनी तयारी सुरू केली असून, वेगवेगळे उपक्रम व भेटीगाठीवर भर देत सणांचे निमित्त साधून बॅनरबाजीही गावाच्या वेशीजवळ आपापल्या मतदारसंघात झळकल्याचे चित्र खालापूर तालुक्यासह खोपोली शहरात दिसत आहेत. तर गावोगाव बैठकांमध्ये गावच्या विकासकांची चर्चा ही करताना इच्छुक उमेदवार दिसत आहेत. तर गावागावात इच्छुक उमेदवारांचे समर्थक पक्षाचे कार्यकर्ते कामालाही लागले आहेत. मात्र, खालापूर तालुक्यात व खोपोली शहरात राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट तसेच भाजपा, शिवसेना ठाकरे गट या प्रमुख पक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या बैठका सुरू केल्या असून, या बैठकीत इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांशी चर्चा करताना फक्त पक्षाकडून येणाऱ्या आर्थिक फंडावर अवलंबून राहू नका, स्वतःची आर्थिक बाजूची तयारी ही करा व किती असेल ते पक्षाकडे माहिती द्या, अशा सूचनाही केल्या जात आहेत. अशा चर्चा पक्ष कार्यकर्त्यांमध्ये दबक्या आवाजात सुरू झाल्या आहेत.

मात्र, खालापुरात आर्थिक निकषावर कर्जतमधील उमेदवारांनी ही लढण्याची तयारी सुरू केली असल्याचे बोलले जात आहे. तशा माध्यमातून बातम्याही छापून आणल्या जात असल्याने आता विकासाच्या गप्पा मारून निवडणूक लढणारे राजकीय नेते आता आर्थिक निकष लावत आहेत. त्यामुळे काम करणारे कार्यकर्ते आगामी निवडणुकीच्या मैदानापासून दूर राहणार तर नेत्याच्या जीवावर निवडणूक लढविणारे इच्छुक उमेदवारांची ही आता अडचण निर्माण झाल्याने या निवडणुकीत विकासाचा मुद्दा बाजूला राहणार यात शंका नाही.

### इच्छुकांची होणार दमछाक

खालापूर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू असून महायुतीमध्ये शिवसेना व राष्ट्रवादी मोठा संघर्ष सुरू आहे त्याचा फायदा घेण्यासाठी भाजपा तयारीत आहे. मात्र आर्थिक निकष हा मुद्दा कायम असल्याने अनेक काम करणारे कार्यकर्ते निवडणुकीच्या मैदानात दिसणार नाहीत हे तितकंच सत्य आहे, मात्र उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुकांची दमछाक होणार आहे.

---

## निवडक

### अंजप गावामधून बैलाची चोरी

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील अंजप गावामध्ये पुन्हा एकदा चोरीची घटना घडली आहे. अंजप गावामध्ये घरासमोरून बैल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. चारचाकी गाडीमध्ये बैल चोरी करून फरार झाल्याची घटना घडली आहे. कर्जत तालुक्यामध्ये वारंवार अशा घटना घडत आहेत.अंजप गावामध्ये घरासमोर अंगणात



बसलेले बैल असताना दोन चोर गाडीतून उतरून बैलासमोर ब्रेड पाव टाकून बैलाला पकडून गाडीमध्ये भरून घेऊन जाण्याचा प्रकार घडला आहे. अंजपमधील शेतकरी तानाजी गणपत माळी यांचा बैल चोरीला गेला आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच अन्नातून बैल चोरला जाणे हे मोठे लज्जास्पद गोष्ट घडली आहे. चोरांची एवढी हिंमत वाढण्याचे कारण त्यांच्यावरती बैल चोरीचा मोठा गुन्हा दाखल करून शिक्षा घडत नाही. त्यामुळे अशा चोरांची चोरी करण्याची हिम्मत वाढत आहे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून येत आहेत. कर्जत तालुक्यामधील अनेक ठिकाणाहून अशा चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्या चोरावरती योग्य ती कारवाई केली जात नाही, त्यामुळे अशा घटना वारंवार घडत आहेत.नेरळ पोलिसांनी नुकतेच बैलगाडी चोरांची टोळी उद्ध्वस्त केली होती. या टोळीकडून चोरून नेलेल्या अनेक बैलचोरी घटना उघडकीस आणल्या आहेत. त्यामुळे अजप येथील घटना कर्जत पोलीस ठाणे हा प्रकार उघडकीस आणून शेतकऱ्यांना न्याय देणार काय? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.



### रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**हमरापूर :** पेण तालुक्यातील कांदेळेपाडा येथील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कांदळेपाडा येथील नितेश वसंत पाटील मित्रमंडळ तसेच आरएमएआर डब्ल्यू एएमआर असोसिएशन पेण युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील कांदळेपाडा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन डॉ. वामन सूर्यवंशी व माजी सरपंच मुरलीधर भोईर यांच्या हस्ते झाले.या कार्यक्रमास पेण युनिट अध्यक्ष नितीन म्हात्रे, सी.आर. म्हात्रे, प्रदीप पाटील, गौरव पाटील, वरद पाटील, हर्षद लांगी, समीर पाटील, राजेश भोईर मिथुन पाटील आदी उपस्थित होते.यावेळी ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. अलिबाग शासकीय रुग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे तातडीने हे रक्तदान शिबीर घेण्यात आल्याचे आयोजक नितेश पाटील यांनी बोलताना सांगितले. शिबीर यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या सदस्यांनी सहकार्य केले.



### विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

**नवी मुंबई :** नवी मुंबई सानपाडा येथील सेवन डे शाळेत ३१ ऑक्टोबर रोजी सानपाडा पोलीस ठाण्याच्यावतीने शिक्षक व विद्यार्थी यांना सायबर सुरक्षा जनजागृतीसंदर्भात माहिती देऊन सायबर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सायबर गुन्हेगारी व सायबर सुरक्षा याबाबत जनजागृती करून माहिती देण्यात आली. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक सुमित केंद्रे आणि पोलिस अंमलदार सीताराम गडदे हजर होते. सायबर फसवणूक कशी होते याबाबत माहिती देताना सांगितले की, मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन शॉपिंग, फेक लिंक, इंस्टाग्राम फेसबुक फ्रॉड, मालवेअर, फोन पे, गुगल पे फ्रॉड, ऑनलाइन ट्रेडिंग फ्रॉड, डिजिटल अरेस्ट फ्रॉड, एनसीसीआरपी पोर्टल व हेल्पलाइन क्रमांक १९३० व १९४५ बाबत माहिती देण्यात आली. तसेच नवी मुंबईचे व्हॉट्सअप व इंस्टाग्राम पेजची माहिती देण्यात आली, अशी माहिती सानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास कठाळे यांनी दिली. आयोजित सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाकरिता शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### कोप्रोली येथील सिद्धीविनायक हॉस्पिटलात डेंग्यूचे चार रुग्ण

**चिरनेर :** उरण तालुक्यातील कोप्रोली येथील सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये डेंग्यूचे चार रुग्ण सापडल्याची माहिती प्राप्त झाली असून, या रुग्णांवर उपचार सुरू आहेत. उरण पूर्व भागातील ग्रामीण भागात डेब्रिज सारखे मातीचे भराव वाढू लागले आहेत. त्यात ग्रामपंचायत हद्दीत सार्वजनिक ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे साम्राज वाढल्यामुळे डासांचा फैलाव वाढू लागला आहे. त्यातच सातत्याने ऊन पाऊस व ढगाळ वातावरणामुळे नागरिकांना साथींच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, कोप्रोली येथील सिद्धविनायक हॉस्पिटलमध्ये अनेक नागरिक सर्दी, ताप, खोकला अशा विविध आजारांवर उपचार घेत असून, त्यातील पाले गावातील एक महिला रुग्ण, धुतूम गावातील एक महिला रुग्ण तसेच चिरनेर गावातील दोन रुग्ण उपचार घेत असून, या चार रुग्णना डेंग्यू झाल्याची माहिती डॉ. सिद्धाराम पाटील यांनी दिली.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- ''जन्नावार हॉस्पीटल'' अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

---

## सेवानिवृत्त शिक्षक संघाच्या कार्यकारिणीची सभा

**। खरोशी । प्रतिनिधी ।**



अखिल महाराष्ट्र सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या पेण तालुका कार्यकारिणी सभा शिक्षक पतपेढी पेण याठिकाणी आज शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली. यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष जगन्नाथ मोकल यांनी सर्वांचे स्वागत केले. मृत झालेल्या सदस्यांना श्रध्दांजली अर्पण केली. अरविंद चव्हाण यांचा वाढदिवस असल्याने संघटनेच्या माध्यमातून पेण तालुका अध्यक्ष राजाराम गावंड व जिल्हाध्यक्ष अमरचंद पाटील यांच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. अरविंद चव्हाण ६५ व्या वर्षात पदार्पण केल्याने त्यांचे पेण कार्यकारिणी व जिल्हा सदस्य यांनी केक कापून अभीष्टचिंतन केले.

यावेळी जगन्नाथ मोकल, पेण तालुका अध्यक्ष राजाराम गावंड, जिल्हा सरचिटणीस गुरूनाथ पाटील, पेण उपाध्यक्षा सीमा सुर्वे, अलका मोकल, सल्लागार रत्नाकर म्हात्रे यांनी आपले विचार व्यक्त केले. जिल्हाध्यक्ष अमरचंद पाटील यांनी सेवानिवृत्त शिक्षक बांधवांचे गटविमा, फंड, निवडश्रेणी, विविध बिले याविषयी सखोल चर्चा केली. पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मीला शेंडे यांची भेट जिल्हा कार्यकारिणी व तालुका कार्यकारिणी सदस्य घेऊन सेवानिवृत्त शिक्षक बांधवांना भेडसावणाऱ्या विविध समस्या व त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

शेवटी पेण तालुका कोषाध्यक्ष प्रदीप म्हात्रे यांनी आभार मानले. ही सभा यशस्वी होण्यासाठी मुरलीधर म्हात्रे, मंगलदास ठाकूर, अलका मोकल, सतीश नवाळे, श्री. कडू, सविता म्हात्रे, पांडुरंग म्हात्रे, भारती पाटील, आशा म्हात्रे यांनी परिश्रम घेतले.

## पोलीस असल्याची बतावणी, चेन, अंगठी घेऊन दोघे पसार

**पनवेल :** पोलीस असल्याची बतावणी करत ८० वर्षीय इसमाकडील सोन्याची चेन आणि अंगठी घेऊन दोघेजण मोटारसायकलवरून पसार झाले. याप्रकरणी २८ ऑक्टोबर रोजी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गोविंद प्रभाकरन हे सेक्टर २० खारघर येथे राहात असून, ते ग्रामविकास भवन, खारघरजवळील भाजीपाल्याच्या बाजारातून भाजी घेऊन घरी रेन ट्री मार्गाने पायी चालत जात होते. त्यावेळी एकाने पिशवी चेक करायचे आहे असे सांगितले आणि पिशवी चेक केल्यानंतर सोन्याची चेन आणि अंगठी हे सोने घेऊन तो पळून गेला.

## कामोठ्यात फायर सेफ्टीबाबत जनजागृती



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

ऐन दीपावली सणामध्ये कामोठेतील एका सोसायटीच्या टॉवरमध्ये पहाटे भीषण आग लागून मायलेकीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेनंतर कामोठे फोरमतर्फे परिसरातील प्रत्येक सोसायटीमध्ये फायर सेफ्टीबाबत जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. आग लागल्यास तात्काळ फायर पंप कसा सुरु करावा, तसेच आग विझविण्याची प्रक्रिया कशी करावी, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक मुंबई अग्निशमन दलाचे कर्मचारी संदीप इथापे यांनी दाखवून दिले.

यावेळी उपस्थित नागरिकांना आगीच्या प्रसंगी तात्काळ कोणती पावले उचलावीत, फायर सिस्टम कार्यरत ठेवण्याचे महत्त्व आणि सुरक्षाविषयक उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

---

## ‘सरसकट नुकसानभरपाई मिळावी’

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

अवकाळी पावसामुळे शेतीच्या झालेल्या नुकसानीची सरसकट भरपाई मिळावी, अशी मागणी वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्था खालापूर, खानाव यांनी आ. महेंद्र थोरवेंकडे निवेदनाच्या माध्यमातून केली आहे. यावेळी तालुक्यातील असंख्य शेतकरी उपस्थित होते. यावेळी परतीच्या पावसामुळे तसेच अन्य पिकाच्या संदर्भात व नुकसानीबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी २३९ शेतकऱ्यांनी ९१, ११ हेक्टर क्षेत्रावर फळ पिक विमा उतरला असल्याचे निवेदनात नमूद केले. त्याचबरोबर भात लागवड ते झोडणीपर्यंत हेक्टरी ५६,००० हजार रुपये खर्च येत असतो. मात्र, शासनाने ८५०० एवढीच रक्कम जाहीर केली आहे. ही शेतकऱ्यांची थट्टा केली जात असल्याचा आरोप करण्यात आला. त्याचबरोबर रायगड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून दर हेक्टरी किमान रुपये ६०,०००/– एवढी नुकसान भरपाई देण्यात यावी, त्याचबरोबर युनिवर्सल सपो येथील व्यवस्थापकास दूरध्वनीवर संपर्क केल्यास उडवाउडवी उत्तरे मिळत असल्याचे निवेदनात नमूद केले.

## जलजीवन योजनेच्या पाण्यासाठी ग्रामस्थ आक्रमक

### ग्रामसभेत पाणीप्रश्न गाजला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील चिंचवली ग्रामपंचायतीमधील एकसल गावाला नळपाणी योजनेचे पाणी मिळत नाही. ग्रामस्थांना जलजीवन मिशनचे पाणी मिळावे यासाठी ग्रामस्थांनी ग्रामसभेत आपली मागणी जोरदारपणे मांडली.

ग्रुप ग्रामपंचायत चिंचवली हद्दीतील एकसल येथे जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाणी मिळावे, अशी मागणी एकसळ गावातील ग्रामस्थांची आहे. या विषयाच्या संदर्भात ३१ ऑगस्ट रोजी सकाळी हनुमान मंदिर एकसळ येथे ग्रामसभा भरवण्यात आली होती. जल जीवन मिशन ही भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने २०१९ मध्ये सुरू केलेली योजना असून, ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला दररोज शुद्ध पिण्याचे पाणी नळाद्वारे नियमितपणे उपलब्ध



करून देणे या योजनेंतर्गत हर घर जल हे लक्ष्य साध्य करण्यासाठी पाणीपुरवठा प्रणाली तयार करणे हे प्रामुख्याने या योजनेचे मुख्य उद्दिष्टे आहे.

या ग्रामसभेमध्ये प्रामुख्याने एकसल गावाची जलजीवन योजना कोणी चालवावी याबाबत निर्णय घेण्यात आला असून, सदर योजना ही सूर्याची बोराडे हे चालवणार आहेत. दरम्यान, यावेळी महिन्याची पाणीपट्टी ठरविणेबाबत निर्णय घेण्यात आले असून, दिवसातून एक वेळा पाणी हवे असल्यास शंभर रुपये, दोन वेळा पाणी हवे असल्यास दीडशे रुपये व तीन वेळा पाणी हवे असल्यास दोनशे रुपये अशी आकारणी या ग्रामसभेमध्ये करण्यात आली आहे. तसेच पाणीपुरवठ्याच्या कामासाठी कर्मचारी नियुक्त करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून, जलजीवन योजना राबवणाऱ्या व्यक्तीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती आपल्या स्तरावर करावी.

पाणीपट्टी वसुलीबाबत पाणीपट्टी न भरल्यास कठोर कार्यवाही करण्यात येणार असून, सहा महिन्यांपेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या व्यक्तीचे पाणीपुरवठा समिती सदस्यपद रद्द करण्याबाबत निर्णय घेण्यात आला, तसेच यापूर्वीपासून सन २००१ ते सन २०२५ पासून कोणत्या योजनेतून पाणीपुरवठा केला त्याचा हिशोब व त्यासंदर्भात सर्व माहिती ग्रामपंचायतीला देण्यात यावी, अशी मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली. या ग्रामसभेमध्ये गावातील ग्रामस्थांनी आपल्या अनेक समस्या ग्रामसेवक यांच्याकडे मांडल्या, त्यावेळी मोठा गदारोळ पाहायला मिळाला अनेक प्रश्न अनेक प्रत्युत्तरे पाहायला मिळाली.

---

## काँग्रेसमध्ये सन्मानाने राहा : घरत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

राजकारणात सध्या कुणाचा पायपोस कुणाला नाही, भाजपमध्ये आमदारालाही बोलता येत नाही, त्यांची चिडीचूप अशी अवस्था आहे. मात्र, काँग्रेसमध्ये सन्मान आहे, प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्या भावना व्यक्त करण्याची मुभा आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनो, काँग्रेसमध्ये स्वाभिमानाने आणि सन्मानाने राहा, असे प्रतिपादन काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष व आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी शेलघर येथे केले.

शनिवारी (दि. १) शेलघर येथील दिवंगत जोमा नारायण घरत समाज मंदिरात रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली होती. यावेळी निवडणूक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करताना महेंद्र घरत म्हणाले, ''स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इच्छुकांनी अर्ज भरावेत. सर्व अर्जांची छाननी करूनच उमेदवारी जाहीर केली जाईल. त्यांनी पक्षातील शिस्त, निष्ठा आणि कार्यकर्त्यांचा सन्मान या तीन घटकांवर विशेष भर दिला.

या बैठकीला रायगड जिल्हा प्रभारी राणी अग्रवाल, प्रदीप राव (प्रभारी अलिबाग विधानसभा), डॉमिनिक डिमेलो (प्रभारी उरण विधानसभा), मनोज कांबळे (प्रभारी पेण विधानसभा), अशोक मोरे (प्रभारी श्रीवर्धन विधानसभा), सुरेश काटकर (प्रभारी महाड विधानसभा), सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, ॲड. श्रद्धा ठाकूर, डॉ. मनीष पाटील, महिला जिल्हाध्यक्ष रेखा घरत, नंदराज मुंगाजी, महाराष्ट्र फिशरमॅन अध्यक्ष मार्तंड नाखवा, रायगड जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अखलाक सिलोत्री, निखिल ढवळे व तालुका अध्यक्ष, तसेच रायगड जिल्ह्यातील विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खपाचीवाडी येथे मातीचा बंधारा

**। गडब ।वार्ताहर ।**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ''पाणी आडवा, पाणी जिरवा या मोहिमेंतर्गत पेण तालुक्यातील काराव–गडब ग्रामपंचायती अंतर्गत खपाची वाडी गडब येथे मातीचा बंधारा बांधण्यात आला.



यावेळी काराव ग्रामपंचायतीच्या सरपंच मानसी पाटील, उपसरपंच सीता पाटील, सदस्य दिनेश म्हात्रे, ग्रामविकास अधिकारी मच्छिंद्र पाटील, अंकुश वाघमारे आदींसह ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते. या बंधाऱ्याचा उपयोग खपाचीवाडीतील आदिवासी बंधू–भगिनींना होणार आहे.

---

## निकष पूर्ण करण्यासाठी महिलांची धडपड | कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी सेवा केंद्रांवर गर्दी

# लाडक्या बहिणींना ‘ई–केवायसी’ बंधनकारक

**। उरण । विठ्ठल ममताबादे ।**

गोरगरीब वंचित घटकातील महिलांना तसेच ज्यांचे आर्थिक उत्पन्न खूपच कमी आहे अशा महिलांना शासनाने लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. मात्र, ही योजना अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांना ई–केवायसी बंधनकारक आहे. यासाठी लाडक्या बहिनींची धडपड सुरू असताना, आता ई–केवायसी करताना पती अथवा वडिलांचे आधार कार्ड जोडण्याची नवीन अट काहींना जाचक ठरत आहे. परंतु, ज्या महिलांचे वडील वारले आहेत व पती हयात नाही किंवा घटस्फोट झाला आहे, अशा महिलांची अधिकच अडचण झाली आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेला कायमचे मुकावे लागणार की



काय, अशी भीती सतावत आहे.

ज्या महिलांचे वडील–पती हयात नाहीत, त्यांची अडचण होत आहे. त्यांच्यासाठी नवीन निर्देश देण्याची मागणी करण्यात येत आहे. नाहीतर त्यांचा हप्ता कायमचा बंद होण्याची भीती त्यांना वाटत आहे. वडील किंवा पतीच्या आधारवरून आता उत्पन्न तपासण्यात येणार आहे.लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी आता कागदपत्रांची पडळातणी केली जात आहे. ज्या महिलांचे वडील–पती हयात नाहीत, त्यांची अडचण होत आहे. त्यांच्यासाठी नवीन निर्देश देण्याची मागणी करण्यात येत आहे. नाहीतर त्यांचा हप्ता कायमचा बंद होण्याची भीती त्यांना वाटत आहे. शासनाने यावर त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी लाभार्थी महिलांनी अर्थातच लाडक्या बहिणींनी प्रशासनाकडे केली आहे.

### सेवा केंद्रावर महिलांची गर्दी

**या योजनेसाठी स्वतंत्र संकेतस्थळावर अथवा ई–महासेवा केंद्रावर महिलांना ई–केवायसी पूर्ण करता येणार आहे. लाडकी बहीण योजनेसाठी शासनाकडून सक्तीची करण्यात आलेली केवायसी करण्यासाठी महिलांची सेवा केंद्रामध्ये गर्दी होत आहे. परंतु, अनेक वेळा सर्व्हर डाऊनची समस्या निर्माण होत असल्याने शहर व गाव खेड्यात येणारे महिलांना परत जावे लागत आहे. अनेक वेळा आधारकार्डमध्ये काही समस्या असल्याचे केवायसी होत नाही. यामुळे अनेक महिलांची योजना बंद होण्याची भीती वाटू लागली आहे. लाडकी बहीण योजनेत अनेकदा वेगवेगळे बदल करण्यात येत असल्यामुळे तसेच प्रत्येक वेळी निकषा मध्ये बदल करण्यात येत असल्याने लाभार्थी महिला अडचणीत आल्या आहेत. सारख्या बदलत राहणाऱ्या निकषामुळे महिला वर्गामध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

### आवश्यक कागदपत्रं

शासकीय योजनेच्या या लाडकी बहीण योजनेत ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आधार कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, रहिवासी दाखला, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, उत्पन्नाचा दाखला, बँक खात्याची सविस्तर माहिती, पती अथवा वडिलांचे आधार कार्ड क्रमांक नोंदवावे लागणार आहे. तरच ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण होईल. बोगस लाभार्थी ओळखण्यासाठी आणि पात्र लाभार्थ्याला लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळण्यासाठी ई–केवायसी योजना सुरू करण्यात आली आहे.

# आदिवासींचा रस्ता चिखलात



। नेरळ । प्रतिनिधी ।

## ● माथेरान डोंगरातील रस्त्याची दुरवस्था
## ● स्वातंत्र्यानंतर अद्याप पक्का रस्ता नाही

माथेरानच्या पायथ्याशी गेले अनेक वर्षांपासून आदिवासी वाड्या वसलेल्या आहेत. मात्र, स्वातंत्र्यकाळापासून या आदिवासी वाड्या अद्यापही रस्त्यापासून वंचित आहेत. गेले अनेक वर्षांपासून हे आदिवासी बांधव आपल्या श्रमदानातून रस्ता बनवत असतात. मात्र, हा रस्ता दिवाळीनंतर बनवला जातो. या रस्त्याला महेश विरले यांनी जेसीपी लावून माती टाकण्यात आली. त्यानंतर पावसाला सुरुवात झाली. जोराचा पाऊस असल्यामुळे या धनगर वाडा, बेकरेवाडी, अस्सल वाडी, नाण्याचा माळ या आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्त्याची दुरवस्था झाली आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे या आदिवासी बांधवांना स्वतःची वाहने नेण्यासाठी जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

माथेरानच्या पायथ्याशी असणाऱ्या आदिवासी वाड्यांना स्वातंत्र्य काळापासून रस्ता नाही. मात्र, हे आदिवासी वाडीतील लोक आपल्या श्रमदानातून रस्ता करत असतात. मात्र, यावर्षी हा रस्ता सरपंच महेश विरले यांच्या माध्यमातून करण्यात आला मात्र या रस्त्यावर दिवाळीनंतर मातीचा भराव टाकण्यात आला त्यानंतर मुसळधार पाऊस पडायला सुरुवात झाली मुसळधार पाऊस पडल्याने या रस्त्याची दूर अवस्था आपल्याला पाहायला मिळाली. या रस्त्याला मोठ्या प्रमाणात चिकन झाल्याने दुचाकी स्वार व पायी जाणारे चे आदिवासी वाडीतील लोक आहेत यांना आपला प्रवास करताना जीव घेणे प्रवास करावा लागत आहे. मोठ्या प्रमाणात चिखल असल्याने या ठिकाणी वाहन चालवणेदेखील अवघड जात आहे. समजा या आदिवासी वाढीमध्ये एखादी मोठी घटना घडली तर या आदिवासी वाडीतील लोकांना या घटनेला सामोरे जाताना खूप मोठा अडचण निर्माण झालेले पाहायला मिळत आहे

कारण या रस्त्याला कुठल्या प्रकारे वाहन जात नसल्याने या ठिकाणच्या रस्त्याची दूर अवस्था पाहायला मिळत आहे. या रस्त्यावर जेव्हापासून माती टाकण्यात आली, त्यानंतर येथील आदिवासी लोकांचे नाहक हाल आपल्याला पाहायला मिळालेत. मात्र, माती टाकल्यानंतर कुठलाही राजकीय नेता या रस्त्याकडे डोकावला आलेला नाही. आज या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या ठिकाणी राहणारे आदिवासी लोक आपल्या स्वतःची दुचाकी घेऊ आपला प्रवास करत असताना आपला जीव धोक्यात टाकून हा प्रवास करावा लागत आहे. या आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता हा एकूण पाच किलोमीटर लांबीचा आहे. या रस्त्यावर आदिवासी बांधवांनी श्रमदानातून मातीचा भराव टाकण्यात आला होता, परंतु, सातत्याने पडणाऱ्या पावसाने चिखल झाला आहे.

# बापू घाडीगावकर सेवानिवृत्त




। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या गोदी विभागातील गोदाम अधीक्षक, ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे सचिव आणि सामाजिक कार्यकर्ते बापू तातू घाडीगावकर हे ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर १ नोव्हेंबरपासून सेवानिवृत्त झाले.

त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल गोदी विभागातील कर्मचाऱ्यांनी ३० ऑक्टोबर रोजी इंदिरा गोदीतील हमालेज बिल्डिंग येथे सन्मान सोहळा आयोजित केला होता. गोदीतील कर्मचाऱ्यांच्या वतीने ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे सरचिटणीस केरसी पारेख, मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस सुधाकर अपराज, मुंबई पोर्ट प्राधिकरण स्थानीय लोकाधिकार समितीचे अध्यक्ष मिलिंद घनकुटकर यांच्या हस्ते बापू घाडीगावकर यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी केरसी पारेख, सुधाकर अपराज, मिलिंद घनकुटकर, मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे, ज्ञानेश्वर वाडेकर, मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे सेक्रेटरी दत्ता खेसे, प्रसिद्धी प्रमुख मारुती विश्वासराव, ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे सेक्रेटरी बबन मेटे आदी मान्यवर उपस्थित होते.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# कवी हरप्रसाद दास यांना पुरस्कार

। नाशिक । प्रतिनिधी ।

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दिला जाणारा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार (वर्ष २०२५) ओडिया कवी हरप्रसाद दास यांना जाहीर करण्यात आला आहे. लवकरच या पुरस्काराचे वितरण विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या उपस्थितीत केले जाणार आहे.



सन २०१० पासून सुरू झालेला हा पुरस्कार विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत दरवर्षी एका निवडक अ-मराठी कवीला दिला जातो. यात रोख एक लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र दिले जाते. याआधी सुप्रसिद्ध कवी चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मलयाळम), सीतांशू यशश्चंद्र (गुजराथी), सुरजीत पातर (पंजाबी), श्रीमती टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड), अमिताभ गुप्ता (बंगाली), नीलिमकुमार (आसामी), कुमार अंबुज (हिंदी) अशा दिग्गजांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

यंदाच्या पुरस्कारासाठी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने ओडिया कवी हरप्रसाद दास यांच्या नावाची एकमताने शिफारस केली. समितीत नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व श्री. विलास गीते यांचा समावेश होता. समितीचे समन्वयक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पहिले, अशी माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी दिली आहे.

सन १९४६ मध्ये जन्मलेले हरप्रसाद दास यांची आतापर्यंत एकूण ३५ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यामध्ये बारा काव्यसंग्रह, चार समीक्षा ग्रंथ, एक कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'देश', 'अपार्थिव', 'प्रेम कविता', प्रार्थना के लिये जरुरी शब्द', 'गर्भ गृह' हे काव्यसंग्रह हिंदीतही प्रकाशित आहेत. 'गर्भ गृह'ला साहित्य अकादेमी पुरस्कार मिळाला आहे. 'वंश' काव्यसंग्रहाला भारतीय ज्ञानपीठाचा मुर्तीदेवी पुरस्कार मिळाला आहे. कवितेसाठी असलेला गंगाधर मेहर राष्ट्रीय पुरस्कारही मिळालेला आहे. उडिया जनजीवनाबद्दल त्यांनी तीन खंडांत इतिहास लिहिला आहे.

हरप्रसाद दास यांनी वयाच्या बावीसाव्या वर्षी भारतीय प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. केंद्र सरकारमध्ये विशेष सचिव म्हणून सेवा सुरु असतानाच त्यांची प्रशासकीय ट्रिब्युनलचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. एर्नाकुलम व ओडिशा येथे त्यांनी न्यायदानाचे काम केले आहे.

## ज्येष्ठांचा पूरग्रस्तांना मदतीचा हात

**चिपळूण** : चिपळूण ज्येष्ठ नागरिक संघाचा मेळावा नुकताच संघाच्या पाग कार्यालयात संघाचे अध्यक्ष उस्मान बांगी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी अनेकांनी आपले योगदान म्हणून देणगी दिली. ती रक्कम लवकरच मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा केली जाणार आहे. मेळाव्यात ऑक्टोबर महिन्यात वाढदिवस असलेल्या उपस्थित सभासदांना गुलाबपुष्प देऊन, त्यांचे औक्षण करून नंतर केक कापून शुभेच्छा देण्यात आल्या. संघाचे सभासद शांताराम तांबे यांनी १०१ वर्षात पदार्पण केल्याने त्यांचा शाल, श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष उदय वेल्हाळ, सचिव रत्नमाला कळंबटे आदी उपस्थित होते.


**शुक्र.दि.७ नोव्हेंबर रात्रौ ९.३० वा.**
**पी.एन.पी. नाट्यगृह (अलिबाग) A/C**
**ति.वि. ३ नोव्हें. पासून पीएनपी नाट्यगृह येथे सुरु**
**संयोजक : चंद्रकांत पानकर ९८८१४६२४६६**



ऑनलाईन तिकिट विक्री bookmyshow

एसपी क्रिएशन निर्मित
नवनीत प्रकाशित

हीच खरी **फॅमिलीची गंमत** आहे

लेखन दिग्दर्शन गीते **संतोष पवार**

नेपथ्य संदेश बेंद्रे
संगीत आशुतोष वाघमारे
प्रकाश योजना निखिल सातोपे
वेशभूषा हास्या पवार

कलाकार शलाका पवार, हर्षदा कर्वे, प्रतिक पाध्ये, विनिषा कुलकर्णी, राकेश शालिनी आणि संतोष पवार व सागर कारंडे

संपर्क - विकास पावसकर ९९२०६२९९२३, सुनील पानकर ९४२२६३०१०५


## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत आमचे अशिल श्री. गणेश संभाजी म्हसे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नरेश नारायण कलंबस्ते व श्री. नाना रामा विरले यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ७८ | १२ | २.४५.०० | २४.५० |

वरील वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/११/२०२५

सही/-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या वतीने आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत गाव सातघर व पेंढांबे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील संबंधित जमिनींच्या भूखंडांसंदर्भात (यापुढे एकत्रितरीत्या जमिनी म्हणून उल्लेखित) जमीनमालकांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत ज्यांनी आम्हाला असे सूचित केले आहे की, ते जमिनींचा भाग बनत असलेल्या संबंधित जमिनींच्या भूखंडाचे संपूर्ण मालक आहेत तसेच सदर जमिनी या कोणत्याही प्रकारच्या सर्व भारांपासून मुक्त आहेत.आमचे अशील हे सदर जमीनमालकांकडून जमिनींची खरेदी करू इच्छित आहेत.

कोणीही वा सर्व व्यक्तींचा जमिनी वा त्यांचे कोणतेही भाग वा कोणतेही एफएसआय वा संभाव्य विकास यांमध्ये उत्तराधिकार, विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, हिस्सा, गहाण, प्रभार, कर्जे, आगाऊ रकमा, विमोचन, परित्याग, भाडेकरार, लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्स, देखभाल तत्त्वावर, धारणाधिकार, इच्छापत्र, अभिहस्तांकन, वहिवाट, भेट, विनिमय, भार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कर्ज तडजोड, इच्छापत्र, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, ताबा, कब्जा, कोणतेही विधि न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांचा निवाडा, आदेश वा हुकूम, कंत्राटे/करार/विक्री करार, अभिहस्तांकन, करार, सामंजस्य करार, हेतूपत्र/टर्म शीट/हेड ऑफ टर्म, विकास / संयुक्त विकास हक्क, भागीदारी, हक्क मार्ग, विचाराधीन विवाद, आरक्षण, मुखत्यारपत्र, पर्याय, प्रथम नकाराधिकार, पूर्व क्रय अधिकार वा कोणतेही दायित्व वा कोणतेही वचनबद्धता वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, दावा, लाभ, हितसंबंध, मागणी, विवाद, शंका, हिस्सा वा संपत्ता वा कोणताही अविभाजित हक्क, अधिकार, हिस्सा वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात खालील निर्देशित पत्त्यावर अधोहस्ताक्षरितांना त्यांच्याद्वारे करण्यात येत असलेल्या वा निहित असे दावे, मागण्या वा हक्क ज्याआधारावर असतील तशा सर्व दस्तावेजांचय प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असे सर्व हक्क, दावे, मागण्या, हिस्से, संपत्ती, लाभ व/वा हितसंबंध हे अधित्यागित समजण्यात येतील व आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील जे अशा त्यांच्या कोणत्याही संदर्भाविना/अडथळ्याविना जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया करतील.

**वरील संदर्भित अनुसूची**
**(जमिनींचे विवरण)**

| गाव | जुना गट क्र. | नवीन गट क्र. | क्षेत्र (आर मध्ये) | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| सातघर | १७/१सी<br>१७/१ए<br>१७/४ | ६<br>९<br>१३ | २३<br>२६<br>१० | लालचंद गंगाधर पाटील |
| पेढांबे | २०८ | १६० | ३७.९ | १. संजय सदानंद पाटील,<br>२. सुमन द्वारकानाथ पाटील<br>३. हिराबाई सदानंद पाटील,<br>४. नीलेश सदानंद पाटील,<br>५. सुरेखा प्रकाश गावंड,<br>६. नीता गणेश पाटील,<br>७. नितीन बाळाराम पाटील,<br>८. भाग्यश्री गणेश पाटील,<br>९. सुधीर बाळाराम पाटील,<br>१०. हर्षदा गणेश पाटील,<br>११. रश्मी शैलेश फडके,<br>१२. संतोष सावळाराम पाटील,<br>१३. सुनीता विलास पाटील,<br>१४. मालती जनार्दन म्हात्रे,<br>१५. उर्मिला लक्ष्मण पाटील,<br>१६. सुषमा नितीन पाटील. |
| | १६८ | १६५ | २०.२ | मंजुळा लक्ष्मण म्हात्रे |
| | १९५ | १९९ | ५०.२ | १. आयेशाबिबी इस्माइल दाखवे,<br>२. फकीर मोहम्मद जैनुद्दीन लंबाटे,<br>३. आसीफ जैनुद्दीन लंबाटे,<br>४. रजीया नफीस गोरमे,<br>५. सुलतान जावेद दांडेकर,<br>६. महजबीन इम्रान अरब. |
| | एकूण क्षेत्र | | १६७.३ आर | |

दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२५

**कु. अनुजा केडिया**
वरिष्ठ भागीदार
मेसर्स परिणम लॉ असोसिएट्स १३ वा मजला,
एक्सप्रेस टॉवर्स, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
**उप प्रादेशिक कार्यालय रायगड-२**

**पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना**

मे. मोवा डिस्टिलरिज प्रा. लि., स. क्र. ८/१, ८/२ आणि ८/५, गाव अंबिवली त. कोतल खलाटी, ता. कर्जत, जि. रायगड यांच्या प्रस्तावित ३ कि. लि./दिन महुवा फुलांवर आधारित मद्य निर्मिती आणि बॉटलिंग प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या सभोवतालच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सदरील जनसुनावणीसाठी उपस्थित राहता येईल.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**ठिकाण –** **स. क्र. ८/१, ८/२ आणि ८/५, मौजे आंबिवली त. कोतल खलाटी, ता. कर्जत, जि. रायगड (प्रस्तावित प्रकल्पाच्या आवारात).**
**दिनांक –** **०५.१२.२०२५ (शुक्रवार)**
**वेळ –** **दु. १२.३० वाजता**

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात-

**प्रादेशिक कार्यालय / उप-प्रादेशिक कार्यालय रायगड-२,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,**
**६ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४.**
**ई-मेल : sroraigad2@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड.
२) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
३) जिल्हा परिषद कार्यालय, अलिबाग, रायगड.
४) जिल्हा परिषद कार्यालय, पुणे.
५) जिल्हा उद्योग केंद्र, रायगड.
६) जिल्हा उद्योग केंद्र, पुणे.
७) मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ८, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२.
८) सह- संचालक, (जप्रनि), म. प्र. नि. मंडळ, सायन, मुंबई.
९) प्रादेशिक कार्यालय, रायगड आणि उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२ म. प्र. नि. मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
१०) प्रादेशिक कार्यालय, पुणे आणि उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, म. प्र. नि. मंडळ, जोग सेंटर, दुसरा आणि तिसरा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रोड, पुणे- ४११ ००३.
११) झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ४४० ००१.
१२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१३) मा. पोलिस अधिक्षक, ता. अलिबाग, जि. रायगड.
१४) मा. उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
१५) मा. तहसिलदार कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
१६) मा. गट विकास अधिकारी, ता. कर्जत, जि. रायगड.
१७) मा. उपविभागीय अधिकारी, ता. खेड, जि. पुणे.
१८) मा. तहसिलदार, ता. खेड, जि. पुणे
१९) मा. गट विकास अधिकारी, ता. खेड, जि. पुणे.
२०) मा. उपविभागीय अधिकारी, ता. मावळ, जि. पुणे.
२१) मा. तहसिलदार, ता. मावळ, जि. पुणे
२२) मा. गट विकास अधिकारी, ता. मावळ, जि. पुणे.
२३) ग्रामपंचायत कार्यालय:- नांदगाव, ओलमन, खांडस, वारे, पाथ्रज, अंबरपाडा, राजपे, बोरिवली, कशेळे, मोगराज, जांबरुंग, सावळे, मांडवणे, भालिवडी, वैजनाथ, भिवपुरी, हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड.
२४) ग्रामपंचायत कार्यालय:- निगडाळे, वांद्रे, ता. खेड, जि. पुणे.
२५) ग्रामपंचायत कार्यालय:- सावळे, खांड, ता. मावळ, जि. पुणे.

सही/-
**उप प्रादेशिक अधिकारी रायगड-२**

## - जाहीर नोटिस-

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिल श्री. विवेकानंद नारायण मोकल, रा. तिरुपती अपार्टमेंट, बालाजी मंदिराच्या जवळ, अलिबाग, ता.अलिबाग असे घोषित करतो की,

पुढे वर्णन केलेल्या मिळकतीचे यापुर्वीची नोंदणीकृत खरेदीखत नावाचे दस्त दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडील १) दस्त क्र.२३७७/२००७, दि.०९.०५.२००७ २) दस्त क्र.२५५०/१९९५, दि.०१.१२.१९९५ ३) दस्त क्र.२४७५/१९९०, दि.०९.०८.१९९० हे मूळ दस्त आमचे अशिल मौजे अलिबाग ते नागोठणे येथे एस.टी.ने प्रवास करीत असताना गहाळ झाले आहेत. याबाबत आमचे अशिलाने पोलिस स्टेशन अलिबाग येथे खरेदीखत नावाचे दस्त गहाळ झाल्याबाबत नोंद केलेली आहे. सदरची नोंद अलिबाग पोलिस ठाण्यामध्ये प्रॉपर्टी मिसींग रजिस्टर्ड नं. १०८३/२०२५ अन्वये दाखल आहे व तसा दाखला आमचे अशिलास पोलिस स्टेशन अलिबाग यांनी दि.३१.१०२०२५ रोजी दिला आहे.

आमचे अशिल सारस्वत को. ऑ.बँक लि. शाखा अलिबाग यांजकडून कर्ज घेत आहेत व त्याकरीता टायटल सर्टिफिकेट आमचे अशिलांस देण्याचे आहे. तरी याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू मिळकतीचे टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०३.११.२०२५

**मिलिंद चव्हाण**
ॲडव्होकेट
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

## सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | चाळ ७/३७ | | ६१/४ | ०-४८-० | निर्धारीत पात्रता ६५० चौ.मी. पैकी ५० चौ.मी. | भूखंड क्र.६३, सेक्टर-१७, क्षेत्र-५० चौ.मी. | श्री. उंदऱ्या गणू भोईर | -- |
| २ | चाळ ७/३७ | | ६६/४ | ०-२५-० | | | | |
| | | | एकूण क्षेत्र | ०-७३-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३२०/२०२५-२६

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
**रायगड विभाग, पेण.**

**निविदा सुचना क्रमांक ०७ सन २०२५-२६**

विभागीय अभियंता म.रा.मा.प.महामंडळ रायगड विभाग पेण हे कोणत्याही शासकीय संस्थेचे,उदा सार्वजनिक बांधकाम, म्हाडा इत्यादी यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून अथवा अ नोदंणीकृत परंतू स्थापत्य कांमाचा अनूभव असलेल्या ठेकेदारकडून मोहोरबंद निविदा मागवित आहेत. निविदा संच खरेदी करतेवेळी आयकर प्रमाणपत्र सॉल्व्हंसी नोंदणी प्रमाणपत्र पॅन कार्ड, भागीदारी संदर्भात कागदपत्रे, गेल्या तीन वर्षामध्ये केलेल्या कामाच्या अनुभवाचे दाखले व मशिनरी बाबतचे दाखले तसेच जिएसटी नोंदणी दाखला, कामगार विमा दाखला इत्यादी कागदपत्रांच्या छायंकीत व मुळ प्रती सादर करणे आवश्यक आहे. खुलासेवार तपशील व निविदा सूचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम जी.एस.टी विरहीत | कामाची अनामत रक्कम 1 टक्केप्रमाणे | सुरक्षाठेवीची रक्कम 4 टक्केप्रमाणे | को-या निविदा संचाची रक्कम जीएसटीसह |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.प माणगाव आगारातील महिला विश्रांतीगृह व तिकीट रोकड शाखेची दुरुस्ती करणे | ४,५६,९१४.९१ | ४५७०.०० | १८२७७.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| २ | रा.प. रोहा आगारातील काही भागातील पडलेल्या कुंपनभिंतीचे पूर्णबांधणी करणे | ८,१५,०९०.३० | ८१५१.०० | ३२६०४.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ३ | रा.प रायगड विभागातील एच.आय.जी. इमारत रुमक्र.०२ मध्ये किरकोळ डागडूजीसह रंगकाम करणे | १,१२,३१२.७२ | ११२४.०० | ४४९३.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ४ | रा.प.महाड बसस्थानक (जूने) इमारतीच्या निखळलेल्या आर.सी.सी. भागाची किरकोळ डागडूजी करणे | २९०२०.०० | - | - | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |

क) कोरे निविदा संच मिळण्याचा कालावधीः-

कोरी निविदा पत्रिका देण्याची तारिख - दि.०३.११.२०२५ ते ०८.११.२०२५ पर्यंत सुटया सोडून सोमवार ते शुक्रवार दुपारी १४.०० वा पर्यंत व शनिवार दु.१२.०० वाजेपर्यंत

निविदा सादर शेवट ची तारीख- दि. ०८.११.२०२५ वेळ -१५:०० वा. पर्यंत
निविदा पत्रिका उघडण्याची तारीख - दि. १०.११.२०२५ वेळ -१६:०० वा. पर्यंत (शक्य असल्यास)
कामपुर्ण करण्याची मुदत- १ ते २ कामाकरीता- ६० दिवस
३ ते ४ कामाकरीता- ३० दिवस

टीप :-
१. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने आपल्याकडे राखुन ठेवला आहे.

विभागिय अभियंता
राज्य परिवहन रायगड विभाग, पेण.

## डी.वाय. पाटील स्टेडियम प्रेक्षकांच्या सहभागाबाबत ऐतिहासिक ठरलं

**विनायक दळवी**

२०२५ च्या महिला एकदिवसीय विश्वचषक सामन्यांचे साक्षीदार देशभरातील विविध शहरे आणि स्टेडियममध्ये झाले होते. मात्र, नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमने लीग सामने ते विश्वचषकाच्या उपांत्य फेरीदरम्यान गर्दीने बीसीसीआयपासून ते आयसीसीपर्यंत सर्वांनाच चकित केले. यासंदर्भात आयसीसीचे प्रसिद्धी प्रमुख मीडिया मॅनेजर राजशेखर राव यांनी सांगितले की,आयसीसी गेले कित्येक वर्ष महिलांसाठी क्रिकेट विश्वचषक स्पर्धा आयोजित करीत आहे. मात्र, यंदाची स्पर्धा आयसीसीसाठी देखील आश्चर्याचा धक्का देणारी ठरली आहे. कारण या स्पर्धेत भारतातील सर्वसामान्यांना प्रचंड गर्दी होती. ही गर्दी आम्ही देखील अपेक्षित केली नव्हती. डी. वाय. पाटील या स्टेडियमला तर साखळी सामन्यातील गर्दी देखील अतुलनीय आणि विक्रमी होती. यंदा गुवाहाटी येथील साखळी सामन्यात सहभागाचा उच्चांक झाला होता. मात्र, तो उच्चांक डी.वाय. पाटील स्टेडियममधील साखळी सामन्याने मोडला. या स्टेडियमची प्रेक्षक क्षमता ४१ हजार एवढी असली तरीही प्रत्येक सामन्याच्या वेळी स्टेडियम जवळजवळ फेल झालेले दिसत होते. ही गोष्ट आम्हाला देखील आश्चर्यचकित करणारी अशीच आहे. त्यामुळे यापुढील आयसीसीच्या स्पर्धा भारतात आयोजित करताना डी.वाय. पाटील स्टेडियमचा आयसीसी निश्चित विचार करेल असा विश्वास मलाही आहे.

तसेच, डी.वाय. पाटील स्टेडियमचे जनक आणि यूनिवर्सिटीचे प्रमुख डॉ. विजय पाटील यांनी यासंदर्भात पत्रकारांशी बोलताना देखील आम्ही आवश्यक त्या ठिकाणी नूतनीकरण तातडीने करणार आहोत. असे सांगितले. प्रामुख्याने मीडिया बॉक्स आहे तेथील काही त्रुटी तात्काळ दूर करण्यासाठी मीडिया बॉक्सची नव्याने उभारणी करण्यात येणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी पत्रकारांना दिले. त्यामुळे डी.वाय. पाटील स्टेडियमला भविष्यकाळात आयसीसीच्या पुरुषांच्या स्पर्धेतील सामने देखील मळिण्यास काही अंशी मार्ग मोकळा झाला आहे, असे वाटते. नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियम ला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांच्या दृष्टीने सक्षम होण्यासाठी आणि विश्वचषकासारख्या जागतिक दर्जाच्या क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आयोजित करण्यासाठी १८ वर्षे लागली. जेमिमा रॉड्रिग्जच्या उपांत्य फेरीतील कामगिरीनंतर, भारतीय संघाला जवळजवळ पराभवाच्या गर्तेतून बाहेर काढून अंतिम फेरीत घेऊन गेल्यामुळे विश्वविजेते बनण्याच्या आशा उंचावल्यानंतर, रविवारी या स्टेडियममध्ये प्रेक्षकांनी खचून गर्दी केली होती. त्यामुळे अंतिम सामन्याचे एकही तिकीट शिल्लक राहिले नव्हते. त्यामुळे आधारासाठी एकही खांब नसलेल्या स्टेडियमची दोन दशकांची विश्वचषक अंतिम सामना आयोजित करण्याची प्रतीक्षा रविवारी संपली.

२००७ मध्ये बांधलेल्या या स्टेडियममध्ये २००८ आणि २०१० मध्ये आयपीएल फायनलचे आयोजन केले होते आणि तेव्हापासून ते महिला क्रिकेटचे केंद्र बनले आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी अलीकडेच याला 'महिला क्रिकेटचे घर' म्हटले आहे. पाटील म्हणाले की, डिसेंबर २०२२ मध्ये भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० मालिकेदरम्यान स्टेडियमने ४५ हजार लोकांची विक्रमी गर्दी केली होती, जी महिला क्रिकेटसाठी एक महत्त्वाचा टप्पा होता. ऑस्ट्रेलियामध्ये असेच मैदान पाहिल्यानंतर त्यांना ही जागतिक दर्जाची सुविधा बांधण्याची प्रेरणा मळिाल्याचे पाटील म्हणाले. ते पुढे म्हणाले, या स्टेडियमने पहिल्या टप्प्यात आम्हाला चांगली सेवा दिली आहे. आता दुसऱ्या टप्प्याची वेळ आली आहे. महिला विश्वचषक स्पर्धेच्या यशानंतर डी. वाय. पाटील स्टेडियम यापुढे आपल्याला निश्चितच नव्या स्वरूपात दिसेल, असा विश्वास आजचा अंतिम सामना पाहिल्यानंतर वाटते.

# भारताचा कांगारूंवर 'सुंदर' विजय

■ हॉबार्टवर सर्वोत्तम लक्ष्याचा पाठलाग ■ ऑस्ट्रेलियाला पराभूत करून मालिकेत बरोबरी



| हॉबार्ट | वृत्तसंस्था |

**भारतीय संघाने तिसऱ्या टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभूत करून मालिका १-१ अशी बरोबरीत आणली आहे. ऑस्ट्रेलियाने हॉबार्टवर १८६ धावा उभ्या केल्या आणि भारताने हे लक्ष्य पार करून इतिहास घडवला आहे. या मैदानावरील हा सर्वोत्तम लक्ष्याचा पाठलाग ठरला आहे. यावेळी अर्शदीप सिंग याच्या पुनरागमन भारतीय संघासाठी फायद्याचे ठरले. तसेच, वॉशिंग्टन सुंदरनेही नाबाद ४९ धावा करून त्याची निवड सार्थ ठरवली आहे.**

दुसऱ्या टी-२० सामन्यातील पराभवानंतर तिसऱ्या सामन्यासाठी भारताने प्लेईंग इलेव्हनमध्ये ३ मोठे बदल केले होते. हर्षित राणाच्या जागी अर्शदीप सिंगला, कुलदीप यादवच्या जागी वॉशिंग्टन सुंदरला तर संजू सॅमसनच्या जागी जितेश शर्मोला संधी दिली होती. या तिन्ही खेळाडूंनी या सामन्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

यावेळी भारतीय संघाने अखेर नाणेफेक जिंकला आणि कर्णधार सुर्यकुमार यादवने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाने २० षटकांत ६ बाद १८६ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून टीम डेव्हिड आणि मार्कस स्टॉयनिस यांनी वादळी खेळी केली. टीम डेव्हिडने ३८ चेंडूत ८ चौकार व ५ षटकारांसह ७८ धावांची खेळी केली. तर, स्टॉयनिसने ३९ चेंडूत ८ चौकार व २ षटकारांसह ६४ धावांची उत्कृष्ट खेळी केली. त्यानंतर मॅथ्यू शॉर्टने २६ धावांची खेळी केली. दरम्यान, मार्श व ओवेन (०) हे स्वस्त्यात माघारी परतले. यावेळी भारताकडून अर्शदीप सिंगने सर्वाधिक ३ बळी घेतले. वरूण चक्रवर्तीने २ तर शिवम दुबे याने १ बळी घेतला.

ऑस्ट्रोलियाने दिलेल्या १८७ धावांच्या प्रत्युत्तरात भारताने सावध



सुरूवात केली. अभिषेक शर्माने आपल्या वादळी फटकेबाजीच्या अंदाजात सामन्याला सुरूवात केली. त्याने २५ धावा तर गिल १५ धावा करत बाद झाला. त्यामुळे तिसऱ्या सामन्यातही गिल फारशी प्रभावी कामगिरी करू शकला नाही. तर, कर्णधार सूर्यकुमार यादव २४ धावा, तिलक वर्मा २९ धावा आणि अक्षर पटेल याने १७ धावांचे योगदान दिले.

वॉशिंग्टन सुंदरने २३ चेंडूत ३ चौकार व ४ षटकारासह ४९ धावांची खेळी केली. तर, जितेश शर्माने १३ चेंडूत ३ चौकारांसह २२ धावांची शानदार खेळी केली आणि संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली.

## 'रॉकस्टार ऑफ डिफफेन्स' हरपला

**नवी दिल्ली :** भारतीय हॉकीच्या इतिहासातील एक लढवय्या आणि गोलपोस्टचा रक्षक मॅन्युएल फ्रेडरिक (७८) यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय हॉकी जगताने गोलपोस्टचा लढवय्या रक्षक गमावला. १९७२च्या म्युनिक ऑलिम्पिकमध्ये गारठलेल्या मैदानावर हिंदुस्थानी हॉकीला कांस्यपदक मळिवून देणारे गोलरक्षक फ्रेडरिक हे त्या काळातले 'रॉकस्टार ऑफ डिफफेन्स' होते. गेल्या दहा महिन्यांपासून ते कॅन्सरशी झुंज देत होते. जसे ते पेनल्टी कॉर्नरवर उभे राहायचे तसेच ते डोळ्यांत लक्ष, चेहऱ्यावर निश्चय, तोच आत्मविश्वास दाखवत शेवटच्या दिवसापर्यंत जगले, झुंजले. परंतु, शेवटी आयुष्याचा स्कोअरबोर्डही बंद झाला.

## स्काय स्टेडियमचा व्हिडीओ खोटा

| सौदी अरेबिया | वृत्तसंस्था |

मागील काही दिवसांपासून सौदी आरेबियात ३५० मीटर उंचीवर ४६ हजार प्रेक्षकक्षमता असलेले स्काय स्टेडियम उभे राहणार असल्याची चर्चा आहे. तसा व्हिडिओही सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. २०३४ च्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत या उंच आकाशात असलेल्या स्टेडियमवर सामना होईल, अशी चर्चा होती. दरम्यान, या स्टेडियमचा कृत्रिम बुद्धिमतेने (एआय) निर्माण केलेला व्हिडिओही समोर आला होता. हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. लाखो लोकांनी हा व्हिडिओ शेअरही केला होता. अनेकांना सौदी अरेबियाने त्यांच्या निओम मेगासिटी प्रकल्प, द लाईनचा भाग म्हणून हे स्टेडियम प्रस्तावित केले असल्याचे वाटले. मात्र, आता असे समोर आले आहे की,व्हायरल होत असलेली सर्व



माहिती अफवा आहे.

तथापि, सौदी अरेबियाने नव्या मेगासिटी प्रकल्पात रिअल इस्टेट कॉम्प्लेक्सच्या वर फुटबॉल सुविधा उभारण्याची घोषणा केली असली, तरी सध्या जो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, त्याच्याशी याचा काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. एका सुत्राने याबाबत माहिती दिली आहे की, व्हायरल व्हिडिओतील डिझाईन पूर्णपणे खोटे आहे आणि सौदी आरेबियाच्या अधिकृत योजनेशी याचा काहीच संबंध नाही. याबाबत कोणतेही अधिकृत स्त्रोत नाहीत. दरम्यान, काही फ्रेंच मीडियाने हा व्हिडिओ सौदी अरेबियाच्या अधिकृत प्रोजेक्टचा भाग असल्याचे म्हटले होते, परंतु, आता त्यांनी तसे रिपोर्ट्स हटवले आहेत आणि आर्टिकल्सही बदलले आहेत.

## सॅमसन, केएल राहुल संघ सोडणार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

यावर्षी होणाऱ्या आयपीएल २०२६च्या लिलावापूर्वी संजू सॅमसन दुसऱ्या संघासोबत करार करू शकतो. सॅमसन राजस्थान संघ सोडत असल्याची पुष्टी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थान-दिल्ली करारात केएल राहुलचे नाव समाविष्ट होते. दिल्ली गेल्या हंगामात त्यांचा सर्वोत्तम कामगिरी करणारा खेळाडू सोडण्यास तयार नाही. आरआर व्यवस्थापनाला ट्रिस्टन स्टब्ससाठी सॅमसनचा ट्रेड करण्याची कल्पना आवडली आहे. राजस्थानला संजू सॅमसनच्या बदल्यात स्टब्स आणि दुसरा खेळाडू हवा आहे, असे देखील वृत्त आहे. सॅमसनसाठी दोन खेळाडूंच्या अदलाबदलीच्या कल्पनेवर दिल्ली व्यवस्थापन खूश नसल्याचे वृत्त आहे. त्याच अहवालात असेही उघड झाले आहे की राजस्थान रॉयल्सने



सॅमसनला खरेदी करण्यासाठी चेन्नई सुपर किंग्ज व्यवस्थापनाशी संपर्क साधला होता. आरआर रवींद्र जडेजासाठी सॅमसनला ट्रेड करू इच्छित होते. कोलकाता नाईट रायडर्सना टॉप-ऑर्डर फलंदाज आणि कर्णधाराची आवश्यकता आहे, म्हणून संघ केएल राहुलला खरेदी करण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. केकेआरचे नवीन मुख्य प्रशिक्षक आणि केएल राहुल यांच्यातील मैत्री लपलेली नाही.

# भारत अ संघाचा विजय

| बंगळूरू | वृत्तसंस्था |

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील भारत अ संघाने शानदार विजय नोंदवला आहे. बेंगळुरूमध्ये झालेल्या पहिल्या अनधिकृत सामन्याच्या अखेरच्या दिवशी, यजमान संघाने दक्षिण आफ्रिका अ संघाचा तीन गडी राखून पराभव केला. यासह दोन साम न्यांच्या मालिकेत भारतीय १-० अशी आघाडी घेतली. कर्णधार ऋषभ पंतसह अष्टपैलू तनुष कोटियन आणि अंशुल कंबोज यांनी चेंडू आणि बॅटने उत्कृष्ट कामगिरी केली आणि संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

दुखापतीनंतर पुनरागमन केलेल्या ऋषभ पंतने या सामन्यात ९० धावांची शानदार खेळी केली. त्याच्या या खेळीसह भारताच्या विजयाची दिशा निश्चित केली.

### ■ ऋषभ पंतची शानदार खेळी



परंतु, अवघ्या १० धावांनी त्याचे शतक हुकले. दरम्यान, अखेरच्या दिवशी भारत अ संघ अडचणती होता. यजमान संघाने २१५ धावांवर ७ गडी गमावले होते. त्यानंतर अंशुल कंबोज आणि मानव सुथार यांनी सातव्या बळीसाठी नाबाद ६२ धावांची भागीदारी करून संघाला शानदार विजय मळिवून दिला. अंशुल कंबोजने नाबाद ३७ धावा केल्या. मानव सुथारने नाबाद २० धावा केल्या. तनुष कोटियनने २३ धावा केल्या. कर्णधार ऋषभ पंतनेही ११३ चेंडूत ९० धावा काढल्या. आयुष बदोनी ३४ धावा करून बाद झाला. दक्षिण आफ्रिकेकडून तियान व्हॅन वुरेनने तीन बळी घेतले. तर, त्शेपो मोरेकीने २ बळी घेतले. तनुष कोटियनने या सामन्यात बॅट आणि बॉल दोन्हीने उत्कृष्ट कामगिरी केली. या सामन्यात त्याने एकूण ८ बळी घेतले. पहिल्या डावात त्याने १३ आणि दुसऱ्या डावात २३ धावा केल्या. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. तर, अंशुल कंबोजने दोन्ही डावांमध्ये मळिवून ४ बळी घेतले.

## भारताला मिळाला ९०वा ग्रॅण्डमास्टर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताच्या बुद्धिबळ विश्वात आणखी एक तेजस्वी अध्याय लिहिला गेला आहे. चेन्नईचा १६ वर्षीय बुद्धिबळपटू ए. आर. इलमपार्थीने बोस्निया आणि हर्झेगोविनातील जीएम४ बिजेल्जिना बुद्धिबळ महोत्सवात अंतिम नॉर्म मळिवत भारताचा ९० वा ग्रॅण्डमास्टर बनण्याचा मान पटकावला आहे. या तरुण खेळाडूने आपल्या सातत्यपूर्ण



कामगिरीने आणि अदम्य चिकाटीने हे यश मळिवले. डिसेंबर २०२३ मध्ये व्हिएतनाममधील हनोई टुर्नामेंटमध्ये त्याने पहिला ग्रॅण्डमास्टर नॉर्म मळिवला होता. त्यानंतर २०२४ मध्ये सिंगापूर इंटरनॅशनल ओपनमध्ये दुसरा नॉर्म प्राप्त केला. त्यानंतर रिल्टन कप (२०२४-२५) स्पर्धेदरम्यान त्याने २५०० ईएलो रेटिंगचा टप्पा पार करत निर्णायक पाऊल उचलले. अखेर बोस्नियातील अंतिम नॉर्म मळिवत त्याने ग्रॅण्डमास्टर पदवी निश्चित केली आणि हिंदुस्थानच्या नावावर आणखी एक गौरवाचा तुरा खोवला.

## केन विल्यमसनचा टी-२०ला रामराम

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये आपला स्वतःचा एक ठसा उमटवणाऱ्या दिग्गज खेळाडूने निवृत्ती जाहीर केली आहे. न्यूझीलंडचा माजी कर्णधार केन विल्यमसनने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. केन विल्यमसनने त्याच्या भविष्याबद्दल अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या अटकळांनंतर टी-२० क्रिकेटला राम राम करण्याची घोषणा केली आहे. डिसेंबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेवर सर्व लक्ष केंद्रित करणार असल्याचे त्याने स्पष्ट केले. ३५ वर्षीय विल्यमसनने ऑक्टोबर २०११ मध्ये पदार्पणापासून न्यूझीलंडसाठी ९३ टी-२० सामने खेळले आहेत. या महिन्याच्या सुरुवातीला त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेतून माघार घेतली आणि त्यानंतर इंग्लंडविरुद्ध मालिकेला दुखापतीमुळे मुकला. पुढल्या वर्षी भारत व श्रीलंका येथे होणाऱ्या टी-२० विश्वचषकाला अवघे काही महिने शिल्लक असताना केनने निवृत्तीचा निर्णय घेतला.

२२ वर्षे टेनिसमध्ये कारकिर्द | वयाच्या ४५ व्या वर्षी निवृत्तीची घोषणा

# रोहन बोपण्णाचा टेनिसला 'गुडबाय'

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताचा टेनिस स्टार रोहन बोपण्णाने निवृत्ती घोषणा केली आहे. जवळपास २२ वर्षे टेनिसमध्ये कारकिर्द घडवल्यानंतर बोपण्णाने वयाच्या ४५ व्या वर्षी सोशल मीडियावर पोस्ट करत तो निवृत्ती घेत असल्याचे शनिवारी (दि.१) जाहीर केले. त्याने 'गुडबाय... पण हा शेवट नाही.' असे म्हणत त्याचा हा निर्णय सर्वांना सांगितला.

बोपण्णाने त्याचा अखेरचा सामना या आठवड्याच्या सुरुवातीलाच पॅरिस मास्टर्स स्पर्धेत खेळला. त्यात तो कझाकस्तानच्या ॲलेक्झँडर बब्लिकसोबत दुहेरीत खेळला होता. परंतु, त्यांची जोडी पहिल्याच फेरीत पराभूत झाली. त्यानंतर आता भारताचा ग्रँड स्लॅम चॅम्पियन असलेल्या बोपण्णाने त्याच्या निवृत्तीच्या पोस्टमध्ये भावनिक संदेश लिहिला आहे.



बोपण्णाने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, तुमच्या आयुष्याला अर्थ देणाऱ्या गोष्टीचा निरोप कसा घ्यायचा असतो. अविस्मरणीय २० वर्षांच्या प्रवासानंतर आता वेळ आली आहे. मी माझं रॅकेट अधिकृतरित्या लटकवत आहे. मी हे लिहित असताना माझे अंतःकरण जड झाले असून कृतज्ञतेने भरलेले आहे. भारतातल्या कुर्गा या छोट्या गवातून माझ्या प्रवासाला सुरुवात झाली. लाकडाचे ओंडके कापताना माझे सर्व्ह मजबूत झाले आणि कॉफीच्या मळ्यातून धावताना स्टॅमिना मिळाला. तुटलेल्या कोर्ट्सवर स्वप्न पाहाता पाहाता, जगातील मोठ्या मंचापर्यंत पोहचलो, हे सर्व एका स्वप्नाप्रमाणे भासत आहे.

बोपण्णाने पुढे लिहिले की, टेनिस फक्त माझ्यासाठी खेळ नाही, तर त्याने मी जेव्हा हरलो, तेव्हा मला एक उद्देश दिला, जेव्हा मी तुटलो, तेव्हा ताकद दिली आणि जेव्हा जगाने माझ्यावर शंका घेतली, तेव्हा विश्वास दिला. प्रत्येकवेळी जेव्हा मी कोर्टवर उतरलो, तेव्हा मला त्याने चिकाटी शिकवली, पुन्हा उभे राहायला शिकवले, लढायला शिकलवले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी का सुरुवात केली आणि मी कोण आहे, याची आठवण नेहमीच करून दिली.

### ग्रँड स्लॅम जिंकणारा वयस्क टेनिसपटू

**बोपण्णाने वयाच्या ४३ व्या वर्षी इतिहास घडवला होता. त्याने मॅथ्यू एब्डेनसह दुहेरीत ऑस्ट्रेलियन ओपन २०२४ ही ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकली होती. तो दुबेरीत ग्रँड स्लॅम किताब नावावर करणारा, तसेच दुहेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांक मळिवणाराही सर्वात वयस्क टेनिसपटू ठरला होता. बोपण्णाने २०१७ मध्ये फ्रेंच ओपन हा ग्रँड स्लॅम किताबही मिश्र दुहेरी मळिवला होता. तो ग्रँड स्लॅम जिंकणाऱ्या भारताच्या चार खेळाडूंपैकी एक आहे. यापूर्वी लिॲंडर पेस, महेश भूपती आणि सानिया मिर्झा या भारतीय टेनिसपटूंनी ग्रँड स्लॅम जिंकली आहे.**

रोहन बोपण्णाच्या या निवृत्तीच्या घोषणेनंतर त्याला अनेकांनी त्याच्या कारकिर्दीचे अभिनंदन करताना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. बोपण्णाने ग्रँडस्लॅमशिवाय दुहेरीत २६ एटीपी स्पर्धही जिंकल्या. ज्यात त्याने ४४ व्या वर्षी जिंकलेल्या मियामी ओपन २०२४ स्पर्धेचा समावेश आहे.

## माजी क्रिकेटरचा अपघाती मृत्यू

| त्रिपुरा | वृत्तसंस्था|

त्रिपुराचा माजी अष्टपैलू क्रिकेटर राजेश बानिक याचा त्रिपुरात आनंदनगर येथे अपघात झाला. त्यात त्याचा अपघाती मृत्यू झाला. बानिकने २००२-०३च्या हंगामात त्रिपुराकडून रणजी ट्रॉफीत पदार्पण केले होते. १६ वर्षाखालील राज्य संघाच्या निवड समितीतही राजेश बानिक होता. त्याच्या अपघाती मृत्यूमुळे त्रिपुरा क्रिकेटला मोठा धक्का बसला आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेश बानिक याच्या दुचाकीचा अपघात झाला होता. त्यात राजेश गंभीर जखमी झाला. उपचारासाठी त्याला आगरताळा येथील जीबीपी रुग्णालयात नेण्यात आले होते. परंतु, उपचारा आधीच त्याचा मृत्यू झाला होता. राजेशने २००२मध्ये रणजी ट्रॉफीत पदार्पण केले. राज्यात अष्टपैलू क्रिकेटर अशी त्याची ओळख होती. मधल्या फळीतला फलंदाज आणि फिरकीपट्टू म्हणून त्याने नाव कमावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये केलेल्या कामगिरीच्या जोरावर कॉस्टकटर वर्ल्ड चॅलेंज २०० साठी भारताच्या १५ वर्षाखालील संघातही त्याला संधी मळिाली. त्या स्पर्धेत राजेश बानिक अंबाती रायुडू, इरफान पठाण यांच्यासोबत खेळला होता. राजेश बानिकने २०१६-१७मध्ये रणजी चषकाच्या हंगामात देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्रिपुराकडून सर्वोत्तम कामगिरी केली. त्याच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच संघ उप उपांत्य फेरीत पोहोचला. बानिकने ४२ प्रथम श्रेणी, २४ लिस्ट ए आणि १८ टी-२० सामन्यांमध्ये त्रिपुराचे प्रतिनिधीत्व केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)

याशिवाय बोपण्णा २००२ ते २०२३ दरम्यान भारताच्या डेव्हिस कप संघाचा भाग राहिला आहे.